# सुगावा

ISSN 2321 - 8592 dt 8.8.2013

Pune, Sugawa - Vol 50, Issue 10th - June 2023 (Monthly)

Price Rs. 20/- (Pages - 16) Annual Rs. 200/-

वर्ष ५० : जून २०२३ : अंक दहावा : पाने १६

● किंमत : २० रुपये ● वार्षिक वर्गणी २००

● संस्थापक : विलास वाघ ● संपादक : उषा वाघ

## ।। अनुक्रमणिका ।।


- **विज्ञानदिनी तथागतांना आठवूया** - सुभाष वारे ... १
- **न्यायालयीन निकाल, एन्काऊंटर्स व बुलडोझर्समुळे धार्मिक ध्रुवीकरणास मदत.** ... ३
- **Initiating Caste Census: Real Tribute to Ambedkar Today** - डॉ. राम पुनियानी ... ५
- **दलित मुस्लिम -** - पन्नालाल सुराणा ... ६
- **जातीव्यवस्था केवळ भारतात नव्हे, तर भारतीय उपखंडात आहे** - प्रा. डॉ. धनंजय बाबुराव लोखंडे ... ७
- **गोपाळबाबा वलंगकर विचार, कार्य आणि लेखन** - कॉम्रेड भीमराव बनसोड ... ९
- **संघटना बांधणी चिंतन - भाग २** ... ११
- **इतिहास पुनर्लेखन मिथकावर नव्हे तर तथ्यावर हवे** - बापू राऊत ... १२
- **संघटना बांधणी चिंतन - भाग ३** ... १३
- **सहसंवेदना जागवणारा, सुख-शांती-समाधानाचा संदेश देणारा रमझानचा महिना.** - सागर रामभाऊ तायडे ... १४


# विज्ञानदिनी तथागतांना आठवूया

युरोप, अमेरिकेत जाऊन येणाऱ्या भारतीयांचे प्रमाण अलीकडे वाढत आहे. तिकडे जाऊन येणाऱ्या अनेकांना तेथील कार्यसंस्कृतीचे म्हणजेच वर्क कल्चरचे खूपच अप्रूप असते. तेथील लोक वेळ पाळण्याच्या बाबत काटेकोर असतात. आपलं काम वेळच्या वेळी आणि मन लावून करतात. आठवड्याचे पाच दिवस कल्पकतेने भरपूर काम करतात. स्वच्छतेबाबत खूपच आग्रही असतात. इथे तिथे थुंकत नाहीत. एखाद्या ठिकाणी गर्दी असेलच तर शिस्तीत रांगेत उभे राहून आपला नंबर यायची वाट पहातात. याच्या जोडीला तिथल्या समृध्दीचे व आधुनिकतेचेही वर्णन करताना काहीजण थकत नाहीत. अशा एक ना अनेक गोष्टी तिकडे जाऊन आलेले किंवा इथे राहून इंटरनेटवरून तिथली माहिती काढणारे लोक सांगत असतात.

युरोपात रेनेसान्स म्हणजेच प्रबोधन युगाच्या काळात धर्मचिकित्सेला सुरूवात झाली. कुठल्याही घटनेला कार्यकारणभाव असतो आणि तो शोधला पाहिजे ही मानसिकता तिथे रुजली. तर्कावर आधारित कार्यकारणभाव शोधण्याची प्रक्रिया विकसित होऊ लागली. केवळ धर्माची परंपरा सांगते म्हणून किंवा धर्मग्रंथात लिहिले आहे म्हणून तर्काला न पटणारी गोष्ट 'बाबावाक्यं प्रमाणं' किंवा 'ग्रंथवाक्यम् प्रमाणम्' या दबावातून स्वीकारण्याचे अनेकांनी तिथे नाकारले. त्यासाठी काहींनी छळ सोसला तर काहींनी जीव गमावला. पण प्रयोग, निरीक्षण, गृहीतक आणि निष्कर्ष या पध्दतीने जात विज्ञानाच्या क्षेत्रातील संशोधन प्रक्रिया त्यांनी थांबू दिली नाही. पुढे त्यांनी वैज्ञानिक तथ्यावर आधारित नवे तंत्रज्ञान विकसित केले. हे सर्व होत असताना त्याला तिथे विरोध तर झाला, पण विरोध आणि वादविवादातून संवादाची एक प्रक्रिया तिथे हळूहळू विकसित झाली. याच प्रक्रियेचा एक भाग म्हणून प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा आणि संधीच्या समानतेचे तत्व आज तिथे बऱ्यापैकी रुजलेले दिसते. त्यातूनच एक सामूहिक कार्यसंस्कृती तिथे उदयाला आल्याचे दिसते. तंत्रज्ञानाच्या विकासाने पुढील काळात तिथे कारखानदारी वाढली. तंत्रज्ञान आधारित उद्योगांमधून मोठ्या प्रमाणावर मालाचे उत्पादन होऊ लागले. हा जास्तीचा माल खपविण्यासाठी नवनवे प्रदेश शोधून तिथल्या बाजारपेठांवर कब्जा मिळविणे ही त्यांची गरज बनली. हे होण्यापूर्वीच तेथील शासकांनी, भांडवलदारांनी कोलंबस, वास्को द गामा यांच्यासारख्या खलाशी वा दर्यावर्दी लोकांना मोठी जहाजे बांधून देऊन, निधी उपलब्ध करून समुद्र सफरीवर पाठवले होते. पाठवले गेलेल्यांपैकी अनेक जण समुद्रावरील वादळात बुडालेही असतील. पण कोलंबस आणि वास्को द गामा यांनी यशस्वीपणे समुद्र सफर पूर्ण करून पश्चिम

**सुगावा मासिक हे संपादक, प्रकाशक उषा वाघ यांनी व्हिजन ग्राफिक्स, शॉप नं. १ आणि ३, शिवस्मृती अपार्टमेंट, ५०९/५१० बी, शनिवार पेठ, पुणे ३० येथे छापून, श्रीराम सोसायटी, ६८७ सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे ३० येथून प्रसिद्ध केले. संपादक– उषा वाघ**

**'Sugawa' magazine is owned, printed & published by Usha Wagh, printed at Vision Graphics, Shop No. 1 & 3, Shivsmruti Apartment, 509/510B, Shaniwar Peth, Pune-411030 & Published at Shreeram Society, 687 Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030. Editor - Usha Wagh**

**अंक दर महिन्याच्या एक तारखेला प्रसिद्ध होतो. या अंकात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

युरोपाला अमेरिकेची व भारताची माहिती करून दिली होती. कारखान्यात मोठ्या प्रमाणावर होत असलेले उत्पादन विकायला नवे प्रदेश, नव्या बाजारपेठा त्यांना मिळाल्या. यातूनच प. युरोपातील देशांचा साम्राज्यवाद बळकट झाला, वसाहतवाद जगभर पसरला. भारतासह आशिया, आफ्रिका खंडातील अनेक देशांची वसाहतवादी मानसिकतेतून अनेक वर्षे लूट झाली.

आपला आजचा मुख्य विषय वेगळा आहे. युरोपियन समाज धर्मचिकित्सेला प्राधान्य देत होता, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार करत होता, नवे प्रदेश शोधण्यासाठी आपल्या लोकांना समुद्रसफरीसाठी प्रोत्साहन देत होता, कारखाने उभारत होता व कारखान्यातील अतिरिक्त उत्पादन विकायला नव्या नव्या प्रदेशांवर चढाई करून तिथल्या व्यापारावर कब्जा मिळवत होता. त्याच्यानंतर जवळपास चारशे वर्षांनी सुद्धा भारतात यापेक्षा पूर्णपणे उलट्या दिशेचा व्यवहार सुरू होता. 'धर्मशास्त्रानुसार बाईला शिकवणं पाप आहे' अशी भूमिका घेऊन इथली पुरोहितशाही स्त्री शिक्षणाला हिंसक विरोध करत होती. भारतीय असंतोषाचे जनक म्हणून ओळखले जाणारे लोकमान्य टिळक यांना भारतीय स्वातंत्र्याची निकड ब्रिटिश शासक आणि जनतेला समजावून देण्यासाठी जहाजाने इंग्लंडला जाऊन परत भारतात यावे लागले. त्यावेळी इथल्या पुरोहितांनी 'धर्मशास्त्रानुसार समुद्रप्रवास करणे पाप आहे' असा फतवा काढत लोकमान्य टिळकांना प्रायश्चित्त घ्यायला लावले होते. पश्चिम युरोप आणि भारत यांच्या दोन संस्कृतीतला हा फरक समजून न घेता केवळ युरोपातल्या शिस्तीचे, स्वच्छतेचे व परिणामकारक कार्यसंस्कृतीचे गोडवे गाऊन काय उपयोग होणार आहे?

भारतात विज्ञानाच्या उपकरणांसोबत विज्ञानाची सृष्टी अवतरली तरी त्यापाठीमागचा वैज्ञानिक दृष्टिकोन मात्र इथे रुजला नाही. त्यासाठी खुला वादविवाद व संवादातून होणारे विचारमंथनही इथे झाले नाही. विज्ञानावर आधारित कारखानदारी आणि त्यावर आधारित आरामदायी सुखसुविधा एकप्रकारे आयात केल्यासारख्या आपल्याकडे आल्या. त्याचा फायदा ठराविक वरच्या वर्गातल्या समूहांपर्यंत पोहोचला. बहुसंख्य लोक आजही विज्ञानाच्या त्या सुखसुविधावाल्या दुनियेपासून दूर, अभावग्रस्त असं जगणं जगत आहेत. या जगाशी त्यांचा संबंध फक्त तापमानवाढीचे दुष्परिणाम सोसण्यापुरताच आहे. प्रत्येक व्यक्तीचा सन्मान व व्यक्तीची प्रतिष्ठा याचे महत्व भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेने अधोरेखित केलेले असले तरी त्या संकल्पनेपासून आपला समाज आजही कोसो दूर आहे. उच्चजात मानसिकतेचे अनेक जण आजही बळी आहेत. इथे अनेकांना आपल्यातील सुप्त क्षमतांना विकसित करण्याची समान संधीही अद्याप मिळालेली नाही. त्यामुळे अशा वातावरणात शिस्त, वेळेचे नियोजन, काम करतानाची कल्पक मनोवृत्ती, कामाप्रती अविचल निष्ठा हे इथे रुजणेच शक्य नव्हते. यशाची अपवादात्मक वैयक्तिक शिखरे दाखवता आली तरी सामूहिक कार्यसंस्कृतीपासून आपण आजही खूपच दूर आहोत. आणि त्याचे कारण धर्माच्या आधारे रुजवलेली जातीप्रथेची उतरंड आणि पुरोहितांच्या पोटापाण्यासाठी रुजवलेले निरर्थक कर्मकांड यातच शोधावे लागेल. अमक्या दिवशी हे करू नये, तमक्या दिवशी हे खाऊ नये, या दिशेला पाय करून झोपू नये, ग्रहणात भाजी चिरू नये अशा असंख्य फालतू विधिनिषेधांनी भारतीयांची कल्पक दृष्टी व सर्जनशीलता आजही करकचून बांधून टाकलेली दिसते. नवा विचार करण्याची मानसिकता आणि धाडसाने नव्या वाटा चालण्याची मानसिकताच या विधिनिषेधांनी मारून टाकलीय.

पश्चिम युरोपातील लोकांचेही नक्कीच काही दोष आहेत. तिसरं जग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देशांची लूट करून त्यांची स्वत:ची समृध्दी आलेली आहे हे खरेच. आधुनिकतेसोबत येणाऱ्या चंगळवादाला आणि भोगवादाला कसा आळा घालायचा याचे भान त्यांनाही नाहीये. भौतिक समृध्दी आणि पर्यावरणसंवर्धन यांचं संतुलन त्यांना साधता आलेलं नाही.

युरोपातील रेनेसान्सच्या किंवा प्रबोधनयुगाच्या कित्येक शतके आधी भारतात तथागत गौतम बुद्धांनी 'प्रतीत्यसमुत्पाद' म्हणजेच कारण असल्याशिवाय कार्य घडत नाही अशा आशयाचा 'कार्यकारणभाव सिध्दांत' रुजवला होता. जन्माधिष्ठित उच्चनीचता नाकारणारा, यज्ञसंस्कृतीतील कर्मकांड फेकून देणारा तथागतांचा मानवतावादी, विवेकवादी धम्म त्यांच्या निर्वाणानंतरही भारताच्या मातीत खोलवर रुजला होता. मात्र पुढील काळात वैदिकांनी, मनुवादी धर्माच्या समर्थकांनी अतिशय हिंसकपणे बुद्धविचार या मातीतून संपवला. नंतरच्या काळातही भारतीय विवेकी प्रबोधनाच्या परंपरेला वाहती करण्यासाठी संत कबीर, बसवण्णा, संत जनाबाई, संत तुकाराम या परंपरेतील अनेक महानुभावांनी आपलं आयुष्य खर्ची घातलेलं आहे. धर्माच्या नावाने पसरवल्या जात असलेल्या संकुचित, स्वार्थी आणि अवैज्ञानिक परंपरांची चिकित्सा केल्याबद्दल इथेही अनेकांचा छळ झालेला आहेच. म. गांधी, डॉ. दाभोलकर, कॉ. पानसरे अशा अनेकांना जीव गमवावा लागला आहे. हे सर्वजण अस्सल भारतीय विवेकी प्रबोधन परंपरेचे पाईक होते. आजही भारतीय समाजात चांगुलपणाचे आणि प्रगतीचे जे काही अंश दिसत असतील ते या प्रबोधन परंपरेचे परिणाम आहेत. पण या परंपरेचा प्रगतिशील विचार इथे रुजूच द्यायचा नाही यासाठी मनुवादी धर्माच्या समर्थकांनी पुन्हा पुन्हा हिंसक षड्यंत्र रचल्याने इथला बहुजन समाज त्या प्रगतिशील विचारांच्या गाभ्यापर्यंत पोहोचू शकला नाही. आता तर सत्तेच्या पाठबळाने प्रबोधनाचे सर्व चक्रच उलटे फिरवण्याचा प्रयत्न मनुवादी शक्तींनी चालवला आहे. भारत गरीब राहिला, भारत पुन्हा पुन्हा परकीय आक्रमकांच्या टाचेखाली रगडला गेला त्याचे मूळ कारणच 'विषमतेचा पुरस्कार करणारा मनुवादी' धर्म हे आहे.

नुकत्याच झालेल्या २८ फेब्रुवारीच्या राष्ट्रीय विज्ञानदिनाच्या निमित्ताने मुद्दाम या सर्व इतिहासाची उजळणी करूया. भारत हा आपला देश आहे. या देशाच्या इतिहासात आपल्याला अभिमान वाटावा अशा अनेक परंपरा होत्या व आहेत. त्यांच्याशी नाते जोडूया. युरोपातील प्रबोधनयुगातून आलेला धर्मचिकित्सेचा व वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विचार आणि भारताच्या मातीतील विवेकी प्रबोधन परंपरा यांची सांगड घालून भारतातील प्रबोधनपर्वाचा पुढचा अध्याय ताकदीने विकसित केला तर भारतातही एक नवी सर्जनशील अशी सामूहिक कार्यसंस्कृती रुजवणे शक्य आहे. ती यासाठी रुजवायची की, आपल्या सर्वांच्या आनंदी जगण्याचा मार्ग त्यातच सामावलेला आहे.

**- सुभाष वारे**

(दैनिक प्रजापत्रच्या रविवार पुरवणीतील लेख)

# न्यायालयीन निकाल, एन्काऊंटर्स व बुलडोझर्समुळे धार्मिक ध्रुवीकरणास मदत.

भारतीय संविधानाने भारताची लोकशाही राज्यपद्धती म्हणून संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला. त्यानुसार २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान राष्ट्राला अर्पण करण्यात आले. या संविधानानुसार 'एक व्यक्ती, एक मूल्य, एक मत' हे तत्व स्वीकारले. त्यानुसार देशातील प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार मिळाला. त्यात गरीब-श्रीमंत, जात, वर्ण, धर्म, लिंग इत्यादी कोणताही भेदाभेद करण्यात आला नाही. ही भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत मौल्यवान गोष्ट होती. ज्या पक्षाच्या बाजूने बहुमत असेल, त्याचं सरकार बनेल हे तत्व त्यातून स्वाभाविकपणेच सर्वमान्य झाले.

त्यामुळे आपल्या पक्षाचे सरकार सत्तेत यावे यासाठी वेगवेगळे राजकीय पक्ष जनतेला आपल्या बाजूने वळवण्याकरिता, जनतेच्या दैनंदिन जीवनातील जे प्रश्न असतील ते आमच्या पक्षाचे सरकार सत्तेत आल्यानंतर आम्ही सोडवू, अशी आश्वासने आपल्या पक्ष जाहीरनाम्यातून देत होते. याप्रमाणे जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणे व जो पक्ष असे प्रश्न सोडवेल त्या पक्षाला मतदान करणे असा रिवाज पडला.

**धार्मिक ध्रुवीकरणात हातखंडा.**

पण आता तर आपल्या देशातील आरएसएसच्या नेतृत्वाखालील पक्ष संघटनांनी व मुख्यतः त्यांची राजकीय आघाडी असलेल्या भाजपने या देशात स्वाभाविकपणे बहुसंख्य असलेल्या हिंदूधर्मीय मतदारांना धर्माच्या नावाने संघटित करण्याचा व त्यांना आपल्या बाजूने वळवण्याचा प्रयत्न पूर्वीच्या तुलनेत कधी नव्हे इतक्या मोठ्या प्रमाणात व यशस्वीपणे सुरू केला आहे.

जनतेचे जे दैनंदिन प्रश्न होते त्या प्रश्नांवरून लक्ष हटवून व जनतेने सुद्धा ते हटू देऊन हिंदू -मुस्लिम, अल्पसंख्यांक -बहुसंख्यांक अशाच मुद्द्यांवर त्यांना मतदान केले. त्यामुळे स्वाभाविकपणे आपल्या देशात हिंदुधर्मीय जनता जास्त संख्येने असल्याने तेच ठिकठिकाणी त्यानंतरच्या काळात निवडून येत आहेत. हिंदुधर्मीय जनतेला भुलविण्यासाठी त्यांनी 'हिंदू राष्ट्रा'च्या स्थापनेची घोषणा पूर्वीपासूनच केली आहे. तेव्हा आजच्या घडीला हा फॉर्म्युला ते कशा पद्धतीने वापरत आहेत, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या न्यायसंस्थेची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यांच्या निकालांचा वापरही धार्मिक ध्रुवीकरणासाठीच करण्यात येत आहे.

बाबरी मशिदीच्या जागेवर राम मंदिर बांधण्याचा दिलेला निर्णय हा त्यापैकीच एक आहे. या निर्णयाने केवळ भाजप, आरएसएस यांचाच नव्हे तर तमाम हिंदुत्ववाद्यांचा उत्साह वाढला आहे. त्याशिवाय नजीकच्या काळातील असे काही निकाल म्हणजे मलियाना, हाशिमपुरा, नरोदा पाटिया, बिल्कीस बानो इत्यादी प्रकरणी दिलेले निकाल होत. तेही याच प्रकारे हिंदुत्ववाद्यांना मदतनीस ठरतात. यापैकी काही घटना ह्या काँग्रेस सत्तेत असतानाच्या काळात घडलेल्या आहेत तर काही भाजपाच्या काळातील आहेत. पण निकाल मात्र आत्ता भाजपाच्याच काळात लागत आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

मलियाना, हाशिमपुरा येथील मुस्लिम समुदायातील लोकांना पोलीस दलाने गोळ्या घालून ठार मारले आहे. काही प्रकरणी हिंदुत्ववाद्यांनी मुस्लिमांना ठार मारले आहे, जिवंत जाळले आहे, बलात्कार केले आहेत. इतके गंभीर गुन्हे असतानाही अशा गुन्ह्यातील आरोपींना माननीय न्यायालयाने निर्दोष सोडून दिले आहे. ह्या प्रत्यक्ष घडलेल्या घटना आहेत. त्यात जीवितहानी झालेली आहे. बलात्कार झालेले आहेत. असे असतानाही आपल्या येथील नोकरशाहीची रचनाच जणू काही अशी झाली आहे की या लोकांना न्याय मिळणे दुरापास्त व्हावे. त्यासाठी त्यांचा एफ आय आर न नोंदवणे, त्यासाठी टाळाटाळ करणे, साक्षी पुरावे मिळणार नाहीत अशी या यंत्रण कडूनच व्यवस्था होऊ देणे, पुरावे काळजीपूर्वक गोळा न करणे, असलेले पुरावे नष्ट करणे, साक्षीपुरावे असलेच तर त्यांना धाकदपटशाने अथवा आमिषे दाखवून त्यापासून वंचित करणे, न्यायालयापुढे योग्य पुरावे येऊ न देणे इत्यादी सर्व हातखंडे वापरल्या जातात. इतके करूनही काही बाबतीत पुरावे असलेच तरी न्यायालयाच्या दृष्टिकोनामुळेही सदरील आरोपी निर्दोष सुटतात असाच या प्रकरणातून आलेला अनुभव आहे.

**मलियानातील, हासिमपुरा हत्याकांड**

उत्तर प्रदेशातील मेरठच्या सीमेवर असलेल्या मलियाना गावात ३६ वर्षांपूर्वी २३ मे १९८७ रोजी ७२ मुस्लिमांची हत्या करण्यात आली होती. झालेल्या या धार्मिक हिंसाचारप्रकरणी कनिष्ठ न्यायालयाने ४१ आरोपींची नुकतीच निर्दोष मुक्तता केली आहे. उत्तर प्रदेशचे डीजीपी राहिलेले विभूती नारायण राय यांनी या विषयावर बोलताना बीबीसीला सांगितले, 'हे राज्याच्या पूर्ण अपयशाचे प्रकरण आहे. त्याचे सर्व भागधारक म्हणजे पोलीस, राजकीय नेतृत्व, पक्षपाती माध्यमे आणि आता न्यायव्यवस्थाही पीडितांना न्याय देण्यात अपयशी ठरली आहे.' हिंसाचाराच्या हृदयद्रावक घटना घडूनही आरोपींना निर्दोष सोडण्याच्या न्यायालयाच्या निर्णयाने पीडित आणि त्यांच्या कुटुंबीयांना धक्का बसला आहे.

२२ मे रोजी म्हणजे मलियाना हत्याकांडाच्या एक दिवस आधी पीएसीचे लोक हाशिमपुरामध्ये घुसले होते. हाशिमपुरा हा मुस्लिमबहुल भाग असून मलियानापासून फक्त सहा किलोमीटर अंतरावर आहे. पीएसी जवानांनी येथून ४८ मुस्लिमांना घरा बाहेर काढले आणि त्यातील ४२ जणांना गोळ्या घालून ठार केले. त्यानंतर त्यांचे मृतदेह नदी आणि कालव्यात फेकून देण्यात आले. यातीलही सर्व आरोपींना निर्दोष सोडण्यात आले आहे.

**बिल्कीस बानो बलात्काऱ्यांना माफी**

जेव्हा देश स्वातंत्र्याचा वर्धापन दिन साजरा करत होता आणि पंतप्रधान मोदींनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात महिलांचा आदर करण्याचे व्रत घेण्याचे सांगितले होते, त्याच दिवशी गुजरातमध्ये ११ दोषींची सुटका करण्यात आली.

२००२ च्या गुजरात दंगलीत बिल्किस बानोवर सामूहिक बलात्कार आणि तिच्या कुटुंबातील सात सदस्यांच्या हत्येप्रकरणी ११ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा झाली होती आणि त्यांना गोध्रा तुरुंगात ठेवण्यात आले होते. यानंतर गुजरात सरकारने एक समिती स्थापन केली. या समितीने या प्रकरणातील सर्व ११ दोषींना माफी देण्याच्या बाजूने एकमताने निर्णय घेतला आणि त्यांची सुटका करण्याची शिफारस केली. अखेर १५ ऑगस्ट २२ रोजी या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या ११ दोषींची तुरुंगातून सुटका झाली.

**नरोदा पाटिया हिंसाचार:**

२००२ साली झालेल्या या दंगलीत ११ जणांचा मृत्यू झाला होता, ज्यामध्ये गुजरातच्या माजी मंत्री आणि भाजप नेत्या माया कोडनानी आणि बजरंग दलाचे नेते बाबू बजरंगी यांच्यासह ८६ जणांना पोलिसांनी तपासाच्या आधारे आरोपी बनवले होते. पण माया कोडनानी-बाबू बजरंगीसह ६७ आरोपींची आता निर्दोष मुक्तता झाली आहे.

अशी कितीतरी न्यायालयीन प्रकरणे सांगता येतील.

**एन्काऊंटर्स**

एकीकडे हिंदुत्ववादी आरोपी असलेल्या प्रकरणांचे निकाल वरील प्रमाणे लागत आहेत तर दुसरीकडे मुस्लिम धर्मीय आरोपी असलेल्यांचे सरसकट एन्काऊंटर्स करण्यात येत आहेत.

उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये माजी खासदार आणि माफिया अतिक अहमद आणि त्याचा भाऊ अशरफ अहमद यांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. त्याच्या एक आठवडा आधी त्यांचा मुलगा असद अहमद याला उत्तर प्रदेशातील झाशी येथे पोलिसांनी 'एन्काउंटर' करून ठार मारले होते.

२००२ ते २००६ दरम्यान गुजरातमध्ये २३ चकमकी झाल्या. इशरत जहाँ एन्काउंटरही त्यापैकीच एक होते. सोहराब शेख हा पत्नीसह हैदराबादहून महाराष्ट्रात जात होता. तीन दिवसांनंतर शेखला अहमदाबादबाहेर बनावट चकमकीत ठार करण्यात आले. तुलसीराम प्रजापती हा सोहराबुद्दीनचा सहकारी होता आणि पोलीस कोठडीत असताना त्याचा मृत्यू झाला होता. डिसेंबर २००६ मध्ये प्रजापतीची हत्या झाली होती.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या म्हणण्यानुसार, ०१ जानेवारी २०१५ ते २० मार्च २०१९ या कालावधीत देशभरातून बनावट चकमकींशी संबंधित २११ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या प्रकरणांमध्ये पीडितांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्याचे आयोगाने मान्य केले आहे.

**बुलडोझर्स**

त्याचबरोबर कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न करताच जणू काही त्यांच्यावरील गुन्हा सिद्ध झालाच आहे अशा निष्कर्षाला येऊन त्यांच्या घरादारावर बुलडोझर्स चालविण्यात येत आहेत.

प्रयागराज हिंसाचार प्रकरणातील मुख्य आरोपी असलेल्या जावेद मोहम्मदचे घर उत्तर प्रदेश सरकारने बुलडोझरच्या साह्याने जमीनदोस्त केले. त्यावर काही न्यायप्रिय व्यक्तींनी कायदेशीर प्रश्न उपस्थित केले असता उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी ट्विट केले की, 'गुन्हेगार/ माफियांविरुद्ध बुलडोझरची कारवाई सुरूच राहील.'

आतापर्यंत चार वेळा मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री झालेले शिवराज सिंह चौहान यांनी नुकतेच म्हटले होते - 'मी बदमाश आणि गुंडांना सोडणार नाही, आम्ही त्यांना धूळ चारत राहू.' शिवराज सिंह चौहान यांच्या सरकारमध्ये गृहमंत्री असलेले नरोत्तम मिश्रा म्हणाले होते - 'ज्या घरातून दगड आले आहेत, आम्ही त्या घरांना दगडांचा ढीग बनवू.' या वक्तव्यानंतर खरगोन जिल्ह्यातील अनेक मुस्लिम लोकांची घरे आणि दुकाने प्रशासनाने बुलडोझरच्या सहाय्याने जमीनदोस्त केली.

गुजरातमध्येही घरे आणि दुकाने बुलडोझरने पाडण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यानंतरही दिल्लीच्या जहांगीरपुरी येथे झालेल्या जातीय हिंसाचारानंतर बुलडोझरची कारवाई करण्यात आली.

काही दिवसांनी शर्मा यांनी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांचे 'बुलडोजर मामा झिंदाबाद'च्या घोषणा देत स्वागत केले. बेकायदेशीर कृत्य होते ते आता राजकीयदृष्ट्या फायदेशीर कृती बनले आहे.

ज्येष्ठ पत्रकार नीरजा चौधरी म्हणतात, 'अलीकडच्या काळात बुलडोझर वापरण्याच्या परंपरेचे एक कारण म्हणजे 'पाडण्याचे राजकारण'. जर योगी हे उत्तर प्रदेशात करू शकत असतील आणि त्यांना त्याचा फायदा मिळत असेल व आरएसएसचाही पाठिंबा मिळत असेल तर मग शिवराज का नाही करणार अशी कृती ? शिवराजनंतर भाजपशासित प्रत्येक राज्य सरकारला हेच हवे आहे. हे बघून भाजपचे 'धोरण आणि रणनीती' चांगलीच आखलेली आहे, असे वाटते. बुलडोझर चालवून जनतेत लोकप्रियताही मिळते, असे नेत्यांना वाटू लागले आहे.

'आज बुलडोझर हे एका मजबूत हाताचे प्रतीक बनले आहे. तो कोणत्याही प्रकारचा गुन्हेगार असो, त्याला चिरडून टाकू शकतो. यामुळे गुन्हेगारांना अल्पसंख्यांकांच्या नजरेतूनच पाहिले पाहिजे' असा संदेश देण्यात आला. तसाच संदेश इतर राज्यांमध्येही दिला जात आहे.

वरीलप्रमाणे झालेले न्यायालयीन निकाल, एन्काऊंटर्स व बुलडोझरने घरे जमीनदोस्त करणे या प्रकरणांचा उपयोग धार्मिक ध्रुवीकरण करण्यात होत आहे. त्याचबरोबर मुस्लिम समुदायात 'न्यायालयाकडून सुद्धा आता न्यायाची अपेक्षा करता येणार नाही' असे वातावरण निर्माण होत आहे. तो समुदाय एक प्रकारे हतबल झालेला आहे.

गुजरातमध्ये दांडियाच्या काळात मुस्लिम मुलांना चौकात बांधून

(पान क्र. ११ वर)

# Initiating Caste Census: Real Tribute to Ambedkar Today

This year 2023, 14th April saw plethora of organizations celebrating Baba Saheb Ambedkars 132nd birth anniversary probably more than before. The occasion was marked by gaiety and celebratory spirit among the large sections of SC/ST/OBC sections for whom he is the messiah. His contributions are recognized more and more, not only nationally but even at global level with over 150 countries celebrating the occasion. Most groups who are committed to social justice and equality, opposed to birth based hierarchies and injustices celebrate the occasion with deep reverence and hope. One can say that this occasion is also assuming religious overtones as at places rituals are being given more importance than highlighting Babasaheb's values. Surely there is a need to launch and sustain struggles to fulfill the dreams for which Babsaheb struggled all his life.

There are other groups and formations who are deeply opposed to the principles and values for which Ambedkar struggled all his life. As such 'Hindu nationalists', RSS and progeny, are totally opposed to Babasaheb's core aim of 'annihilation of caste'. They project 'harmony among castes' as their credo. Ambedkar stood for affirmative action for the deprived sections of society. Initially there were provisions for reservations for ten years only. Probably Ambedkar had a hope that ten years will be enough to root out the deep malice of Hindu society. He probably did not take into consideration the fact that the implementation of the policy lays in the hands of upper caste elite themselves, who in due course found ways to circumvent the proper implementation of reservation for SC/STs and so it had to be prolonged till the date, which is a requisite for march towards social justice.

The constitution, the drafting of which he presided over, did give the provision for SCs and STs, still leaving out Other Backward Classes. This is a large constituent of the society, about which not much attention was paid for long time. Last time the decadal census which took this into consideration was in 1931. It stood at 52% at that time which later became the basis of giving them 27% of reservations in 1990s. There were some provisions for affirmative action but its proper implementation took place with Mandal Commission implementation only.

The reservations have been an eyesore to certain sections of society and they did float groups like "Youth for Equality" types which stood for abolition of reservations. By word of mouth and other channels it was popularized that due to these reservations, 'non deserving' people find their way and the deserving one's are left out. Social biases got constructed around dalit-OBCs and these social biases did get converted in to the suicides of the likes of Rohith Vemula or Darshan Solanki. These biases also formed the base of anti dalit violence in 1980s in Ahmadabad and anti OBC violence in Gujarat in 1985.

While BJP's parent RSS, initiated social engineering and floated organizations like 'Samajik Samrasta Manch' (Social Harmony Forum) which was an attempt to co-opt these marginalized sections. Its efforts did pay it rich electoral dividends, which are reflected in the presence of large number of BJP MPs and MLAs from the constituencies reserved for these sections. The large force of RSS pracharaks and Swayamsevaks has relentlessly worked in these areas through social engineering, process of sanskritzation, and charity work among these communities.

At ideological level 'Hindu right wing' has made tall efforts to attribute ills of caste system to 'invading' Muslim kings and trying to project that all castes were equal before Muslim kings came, type of formulations. It is no surprise that BJP and its associates also make the show of celebrating Ambedkar anniversary. At the same time they undermine the need for demands like caste census which can pave the way for modification of policies, through which the marginalized sections can benefit in the real sense.

It is this background that Rahul Gandhi's speech in Kolar becomes significant. Mr. Gandhi asked for population census and stated that the results of affirmative action are not as visible as in the case of top bureaucrats like Secretaries in Union Government, hardly 7% belong to these sections. While putting forward this demand he also asked for the Caste census findings conducted under UPA in 2011 be made public. He correctly states that, "The data will provide evidence if Other Backward Classes (OBC), Dalits,

(पान क्र. १६ वर)

# दलित मुस्लिम

भारतात विविध धार्मिक समूह आहेत. त्यातल्या हिंदु समूहात पूर्वी ज्यांना अस्पृश्य मानले जायचे असा सुमारे २० टक्के समूह आहे. त्यांना राजकीय प्रकियेत सहभागी होता यावे यासाठी आरक्षण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने १९३५ साली 'भारत सरकार कायदा' बनवताना त्यांना अनुसूचित जाती असे सरकारी नाव देण्यात आले. देशात आदिवासींची संख्या सुमारे ८ टक्के आहे. त्यांचीही सामाजिक व शैक्षणिक अवस्था लक्षात घेऊन राजकीय व विविध सराकरी योजनांचा लाभ देण्यासाठी 'अनुसूचित जमाती' म्हणण्यात येते. देशात मुस्लिम समूह फाळणीपूर्वी सुमारे २५ टक्के होता. व फाळणीनंतर त्याचे प्रमाण १२ ते १५ टक्के झाले आहे. आपल्या संविधानाच्या उद्दिष्टात सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याला पहिले स्थान देण्यात आले आहे. बरोबरीने वागण्याबाबत जे निर्बंध परंपरेने सुमारे २००० वर्षे चालत आले, ते दूर करणे हा न्याय प्रस्थापनेचा पहिला टप्पा होय. आपल्या संविधानाने कलम १४ मध्ये कायद्यासमोर सर्व नागरिक समान मानले जातील अशी तरतूद करून ते परंपरागत निर्बंध बेकायदेशीर ठरवले आहेत. आर्थिक विकासाच्या संधी मिळण्यासाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये व शिक्षणसंस्थांत प्रवेश मिळण्याबाबत आरक्षण देण्यात आले.

त्यावेळी धोरणकर्त्यांना समाजाचे जेवढे ज्ञान उपलब्ध झाले होते त्याआधारे त्यांनी असे मानले की शैक्षणिक व सामाजिक मागासलेपण हे फक्त हिंदु समूहात आहे. सामाजिक व्यवहारात व राजकीय निर्णयप्रकियेत सर्व नागरिकांना बरोबरीने भाग घेता यावा, त्यात धर्म, जात, लिंग, वंश आदी कारणावरून भेदभाव केला जाऊ नये अशी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे बिगर हिंदू नागरिक वा त्यांचे छोटेछोटे समूह यांना सर्व व्यवहारात बरोबरीने भाग घेता येईल असे वाटत होते. हळूहळू हे लक्षात येत गेले की त्यात्या धर्मात जन्मावर आधारलेला वर्ण किंवा जात यावर भेदभाव करण्याची तरतूद त्या धर्मांनी केलेली नाही. वाण नाही, पण गुण लागला, या न्यायाने अन्य धर्मातही अस्पृश्यता व त्यासारखे भेदभाव केले जात आहेत. या विषयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी नवी दिल्लीच्या इंडियन सोशल इन्स्टिटयूट या संस्थेने एक संशोधन प्रकल्प हाती घेतला. २०११ मध्ये तो पूर्ण झाला. त्याचा संक्षिप्त अहवाल इंग्रजीत प्रसिध्द झाल्यानंतर मीना शेटे- संभू यांनी त्याचा अनुवाद २०१८ साली प्रसिध्द केला. त्यात असे आढळून आले की मुस्लिम, शीख, बौध्द, ख्रिश्चन, व पारशी या धार्मिक समूहातसुध्दा दलित, आदिवासी हे समूह आहेत.

दलित व आदिवासी सोडून शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास राहिलेले समूह लक्षणीय प्रमाणात आहेत. १९६७ मध्ये गोपालसिंग समितीने मुस्लिम समाजातील स्तरीकरणाची नोंद घेतली. पुढे २००६ साली न्या. राजेंद्र सच्चर समितीने मुस्लिमांचे विविध क्षेत्रांतील मागासलेपण स्पष्ट करून मांडले. त्या धार्मिक समूहात दलितही आहेत हे पहिल्यांदा वर उल्लेख केलेल्या इंडियन सोशल इन्स्टिटयूटच्या संशोधन प्रकल्पात नमूद करण्यात आले. त्यांच्या अंदाजाप्रमाणे देशात मुस्लिमांच्या लोकांचे प्रमाण ११.५ टक्के आहे, तर त्यातले ८४ टक्के हे दलित आहेत. १९८२ साली मंडल आयोगाने असे नमूद केले की, ओबीसी जाती मुस्लिम समूहातही आहेत. ओबीसी नागरिकांना शिक्षणसंस्था व सरकारी नोकऱ्या यात आरक्षण देण्यात यावे व त्याचे प्रमाण २७ टक्के असावे. त्याचा लाभ हिंदूंप्रमाणे मुस्लिम ओबीसीनाही देण्याला सुरूवात १९९० पासून झाली आहे. आता हा जो इंडियन सोशल इन्स्टिटयूटचा अहवाल प्रसिध्द झाला आहे त्यावरून असे स्पष्ट होते की 'मुस्लिम दलित' यांना अनुसूचित जाती म्हणून मान्यता देणे आवश्यक आहे.

या संशोधन प्रकल्पाच्या पाहणीत प्रतिसादकर्त्यांनी असे म्हटले आहे की, उच्च जातीचे मुस्लिम हे जुनाह, नट, बक्खो, भटीयारा, कुंजरा, धुनिया, कलाल, डपली, हलकोर, भोबी, लालबेगी, गोरकन, मिरशीकर, चीक, रंगरेज आणि दर्जी यांना आपल्यापेक्षा कनिष्ठ मानतात व मिसळणे, शिक्षणसोय, घरे याबाबतीत सामावून घेत नाहीत. हा अभ्यास उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान व महाराष्ट्र या पाच राज्यांतल्याच सहा जिल्ह्यांच्या मध्ये घेण्यात आला. पूर्व व दक्षिणेकडील राज्ये यांच्यात हा अभ्यास झालेला नाही. मात्र पाच राज्यांत झालेल्या अभ्यासात जे भेदभाव व वगळणूक (एक्सक्लूजन) दिसून आले. ते कमीअधिक प्रमाणात पूर्व व दक्षिणेकडील राज्यांतीलही असतीलच, म्हणून या मुस्लिम दलित समूहाला न्याय मिळावा या दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज आहे. अहवालाच्या 'दृष्टीकोन आणि शिफारशी' या पाचव्या प्रकरणात असे आग्रहाने सुचवले आहे की दलित मुस्लिमांच्या समस्यांची अधिकृत माहिती उपलब्ध करण्याच्या दिशेने देशाची जनगणना व नॅशनल सॅंपल सर्वे या यंत्रणांमार्फत प्रयत्न केले पाहिजेत. सेन्ससच्या तक्त्यामध्ये दलित मुस्लिम हा नवा रकाना घालण्यात यावा. व त्यासाठी संविधानातही दुरूस्ती करण्यात यावी.

सच्चर समितीच्या अहवालावरून हे स्पष्ट झाले आहे की राजकीय, शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक व्यवहारात मुस्लिम समूहाबाबत भेदभाव केले जात आहेत त्याचा परिणाम दलित मुस्लिमांवर तर होतोच, शिवाय मुस्लिमांतही ते दलित मानले गेल्याने त्यांना दुहेरी बहिष्कृततेला तोंड द्यावे लागते. उपरोक्त संशोधन अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की, अगदी नरेगा सारख्या योजनेचाही अवघा ७ टक्के लाभ दलित मुस्लिमांना मिळतो. दलित मुस्लिम वस्त्यांना पेयजल पुरवठा कमी प्रमाणात केला जातो. जलनि:सारण, रस्ते व दिवाबत्ती याबाबत पक्षपात फार कमी प्रमाणात पुरवठा दिसून येतो. मात्र शिक्षणसंस्था, सरकारी नोकरी, बॅंक कर्जपुरवठा, वीजपुरवठासुध्दा कमीकमी प्रमाणात दिला जातो. त्यांची ही वंचितता किंवा उपेक्षा थांबवणे याला विकास योजना आखताना पुरेसे महत्व दिले गेले पाहिजे. पत्रकार, राजकीयपक्ष व स्वयंसेवी संघटना यांनी आपली धोरणे आखतानाही हे पथ्य पाळले पाहिजे.

**पन्नालाल सुराणा**

नळदुर्ग ता. २०/०३/२०२३

# जातीव्यवस्था केवळ भारतात नव्हे, तर भारतीय उपखंडात आहे.

भारतातील बरेचसे विद्वान भारतीय समाज व्यवस्थेचे एक वैशिष्ट्य म्हणून भारतातील जातीव्यवस्थेचा उल्लेख करीत असतात, किंबहुना जातीव्यवस्था हेच भारतीय समाज व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे असे म्हणतात. मर्यादित अर्थाने ते खरेही आहे. पण ते संपूर्ण खरे नव्हे. त्याचे कारण असे की, ते असे गृहीत धरतात की जाती व्यवस्था ही फक्त भारतातच आहे. पण जातिव्यवस्था ही केवळ भारतातच नाही तर भारताजवळील इतर देशात किंबहुना भारतीय उपखंडात आहे. पण हे वास्तव मान्य करणे बहुतेकांना कठीण जाते. त्याचे कारण असे की तसे म्हटल्यास मग भारताचे वैशिष्ट्य ते काय? असा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण होत असावा. त्यामुळे भारताशिवाय इतर देशात ही जाती व्यवस्था आहे, या बाबीकडे ते पूर्णपणे दुर्लक्ष करतात.

ही गोष्ट खरीच आहे की भारतीय समाजव्यवस्थेचे वैशिष्ट्य जातिव्यवस्था हे आहे. पण भारतात सुद्धा ही जातीव्यवस्था स्थळकाल परिस्थिती अन्वये बदलत व विस्तारत गेली आहे. प्रत्येक ठिकाणी ही पूर्वी जशी होती तशीच ती आज नाही. पूर्वीही संपूर्ण देशात सारख्याच प्रमाणात सारख्याच पद्धतीची जातीव्यवस्था अस्तित्वात नव्हती, तर ज्या त्या राज्यातील भौगोलिक परिस्थितीतून निर्माण झालेल्या उत्पादन पद्धतीनुसार, तेथे उत्पादनाची जी साधने उपलब्ध असतील त्यानुसार भारतातील विविध ठिकाणच्या जातीव्यवस्थेच्या स्वरूपात वेगळेपण आहे. परंतु हा बदल ध्यानात घेऊन सुद्धा आपण असे म्हणू शकतो की भारतात जातीव्यवस्था आहे, पण ती फक्त भारतातच नाही तर संपूर्ण भारतीय उपखंडात कमी अधिक जाचक असलेली, विविध स्वरूपातील जातीव्यवस्था आपणाला दिसून येईल.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे जातीव्यवस्थेला जो वैचारिक व धार्मिक आधार दिला तो मुख्यत्वे करून हिंदू धर्मानेच दिला आहे. हिंदू धर्म हा मुख्यत्वे करून भारतात असला तरी तो केवळ भारतातच नाही तर वेगवेगळ्या ठिकाणी सुद्धा तो कमी अधिक प्रमाणात गेलेला आहे. भारतीय लोकांनी विविध ठिकाणी त्यांच्याबरोबर तो घेऊन गेले. त्यामुळे हिंदू धर्माचा अविभाज्य भाग असलेली जाती व्यवस्था सुद्धा ते आपल्या सोबत घेऊन गेले आहेत.

उदाहरणार्थ, इंग्रजांच्या काळात भारतातील बरेचसे लोक जगातील विविध देशात काम करण्यासाठी स्थलांतरित झाले आहेत. त्यापैकी श्रीलंकेत गेलेले भारतातील तामिळ लोकही मोठ्या संख्येने आहेत. तामिळनाडूमध्ये सुद्धा हिंदू धर्म होता व आहे, तेव्हा येथील जे लोक श्रीलंकेत गेले त्यांनी तेथे सुद्धा येथील जाती व्यवस्था घेऊन गेले. श्रीलंकेत जाती व्यवस्था असल्याबाबतचा एक सविस्तर लेख डॉ. सौ. विमल थोरात यांनी त्याप्रसिद्ध करत असलेल्या एका मासिकातील लेखातून स्पष्टपणाने मांडले आहे. अर्थात श्रीलंकेतील जातीव्यवस्था ही तंतोतंत जशाला तशी भारतातील तामिळनाडू सारखीच असेल असे नाही. श्रीलंकेतील परिस्थितीनुसार त्यात थोडाफार बदल झाला असेल हे निश्चित.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, स्वातंत्र्यापूर्वी भारत पाकिस्तान व बांगलादेश हे सर्व मिळून एकच देश होता. स्वातंत्र्यानंतर भारत व पाकिस्तान असे दोन देश झाले व १९७१ नंतर बांगलादेश या तिसऱ्या देशाची पुन्हा भर पडली. तेव्हा पूर्वी भारताचाच भाग असलेल्या पाकिस्तान, बांगलादेश येथे स्वातंत्र्यापूर्वी जाती व्यवस्था नव्हती काय? जर ती होती तर हे देश वेगळे झाल्यानंतर ही जातीव्यवस्था एकाएकी नष्ट झाली काय? किंवा पाकिस्तानातून वेगळे झाल्यानंतर बांगलादेशातील जातीव्यवस्था नष्ट झाली आहे काय? याचा साधा सरळ अर्थ असा आहे की तेथे सुद्धा जातीव्यवस्था असली पाहिजे. फक्त तेथील जातीव्यवस्थेचे स्वरूप तेथील परिस्थितीनुसार भिन्न असू शकते इतकेच. जसे, तेथील बहुसंख्य लोक हे मुस्लिम धर्मीय आहेत व मुस्लिम धर्मात जातीव्यवस्थेला वैचारिक आधार नाही, तरी हिंदू धर्म ज्यांच्याशी संबंधित आला किंवा हिंदू धर्मातील जातिव्यवस्थेला कंटाळून त्याला विरोध म्हणून जे लोक मुस्लिम अथवा ख्रिश्चन धर्मात गेले, तेथेही ते जातीव्यवस्था घेऊन गेले आहेत. यांच्या माध्यमातून हिंदू धर्मातील जाती व्यवस्थेने त्या धर्मात सुद्धा शिरकाव केला आहे. धर्मांतरित झालेला तो जनसमूह ज्या धर्मात व ज्या ठिकाणी राहतो त्या धर्मात व त्या ठिकाणी वेगळ्या स्वरूपात का असेना, पण जातीव्यवस्था अस्तित्वात असते. याप्रमाणे पाकिस्तान आणि बांगलादेशमध्ये सुद्धा जातिव्यवस्था आहे, पण तिचे स्वरूप स्थानिक परिस्थितीनुसार भारतातील जातिव्यवस्थेपेक्षा भिन्न असू शकेल, असे म्हणणे जास्त संयुक्तिक होईल.

ज्यावेळेस भारत-पाकिस्तानची फाळणी झाली त्यावेळेस पाकिस्तानातील अस्पृश्य लोक पाकिस्तानातून भारतात तेथील हिंदू धर्मियांबरोबर स्थलांतर करीत होते. भारत सरकारने अशा स्थलांतरित लोकांची खाण्यापिण्याची, राहण्याची व पुनर्वसन करण्याची तात्पुरत्या स्वरूपात जी व्यवस्था करण्यात येत होती, त्यामध्ये अशा स्थलांतरित झालेल्या अस्पृश्य, मागास जातींच्या लोकांकडे दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारी जेव्हा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांकडे आल्या तेव्हा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी, दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली अशा अस्पृश्य, मागास जातींच्या स्थलांतरितांची व्यवस्था करण्यासाठी एका कमिटीची स्थापना केली. त्याची जबाबदारी या कमिटीचे अध्यक्ष दादासाहेब गायकवाड यांच्यावर सोपविली होती, हे विसरून चालणार नाही. हा मुद्दा येथे सांगण्याचे कारण एवढेच आहे की, पाकिस्तानात सुद्धा अस्पृश्य व मागास जाती होत्या, व याप्रमाणे तेथेही जातीव्यवस्था होती.

उलट, हे मागास जातींचे लोक भारतात परत गेले तर आपल्या येथे हे लोक जे काम करत आहेत ते घाण काम येथे दुसरे कोणते लोक करतील, असा प्रश्न तेथील प्रस्थापित समूहापुढे होता व म्हणून त्यांचा ह्या मागास जातींनी भारतात परत जाण्याला विरोध केला होता, हाही मुद्दा येथे आपण

लक्षात ठेवला पाहिजे. तेव्हा पाकिस्तानातील काही अस्पृश्य किंवा मागास जातींचे लोक भारतात परत आले असले तरी पाकिस्तानातील संपूर्ण जातीव्यवस्था नष्ट झाली आहे, असे आपणाला म्हणता येणार नाही. हीच बाब बांगलादेशला सुद्धा लागू होते.

हिंदू धर्म हा जावा, बाली, सुमात्रा इत्यादी देशांतून सुद्धा आहे असे येथील हिंदू धर्माभिमानी मोठ्या अभिमानाने सांगतात. त्यांच्या संघटनांचेच नाव 'विश्व हिंदू परिषद' वगैरे सारखे असते. अशा देशांतून रामायण, महाभारत यांच्या कथा मोठ्या चवीने ऐकवल्या जातात. इतकेच केवळ नव्हे, तर त्या कथानकांवरील रामलीला वगैरेसारखे कार्यक्रम, नृत्यादी कला सादर केल्या जातात. टीव्हीवरून आपण ते पाहत असतो. अशा परिस्थितीत हिंदू धर्माचा पगडा असलेल्या त्या देशांतून हिंदू धर्माचा अविभाज्य भाग असलेली जातीव्यवस्था नसेल काय? निश्चितच तेथील भौगोलिक परिस्थितीनुसार जाती व्यवस्था असली पाहिजे, असे अनुमान आपल्याला काढता येते.

भारत हा बहुसंख्य हिंदूधर्मीय लोकांचा देश असला तरी अजूनही तो संविधानानुसार धर्मनिरपेक्ष आहे. त्याला हिंदू राष्ट्र बनवण्याचे प्रयत्न चालू असले तरी अद्याप ते हिंदुराष्ट्र झालेले नाही. वीस वर्षांपूर्वी नेपाळ हे तर जगातील एकमेव हिंदू राष्ट्र होते. मग तेथे जातीव्यवस्था नव्हती काय? आता माओवाद्यांनी ते हिंदुराष्ट्र नष्ट करून तेथे त्यांनी नव्याने निर्माण केलेल्या संविधानानुसार ते 'धर्मनिरपेक्ष' राष्ट्र म्हणून घोषित केले असले तरी नुसत्या त्यांच्या तसे घोषित करण्यामुळे हिंदू धर्माशी जैवरीत्या संबंधित असलेली तेथील जातीव्यवस्था तडकाफडकी नष्ट झाली असण्याची शक्यता नाही. भारतही १९४७ साली स्वतंत्र झाला व त्याने १९५० साली धर्मनिरपेक्ष संविधान स्वीकारले तरी अजूनही भारतात बदलत्या स्वरूपात जातीव्यवस्था कायम आहे. तशी ती आत्ताच 'धर्मनिरपेक्ष' झालेल्या नेपाळ मध्ये अजूनही कायम आहे. मग अशा परिस्थितीत आपण असे म्हणू शकतो काय की जातीव्यवस्था ही फक्त भारतातच आहे किंवा ते फक्त भारताचेच वैशिष्ट्य आहे?

पाकिस्तानातील मुख्तार माईवरील बलात्कार हा जगभर गाजलेले बलात्कारचे प्रकरण आहे. जसे आपल्या देशातील हाथरसचे बलात्कार प्रकरण गाजले आहे, तसेच पाकिस्तानातील मुख्तार माई बलात्कार प्रकरण आहे. हा बलात्कार तेथील जमीनदारी पद्धतीशी संबंधित असलेल्या जातीव्यवस्थेच्या न्याय निवाड्यातून झाला आहे, हा मुद्दा येथे आपण ध्यानात ठेवला पाहिजे.

त्याचप्रमाणे, भारतातील जातीव्यवस्थासुद्धा संपूर्ण देशातील सर्व राज्यात एकसारखीच नाही. प्रत्येक राज्यातील जातीव्यवस्थेचे स्वरूप हे वेगवेगळे आहे. भारतातील काही राज्यांतून जमीनदारी पद्धत, काही ठिकाणी रयतवारी पद्धत व काही भागात महालवारी पद्धत अस्तित्वात होती. तिचे अवशेष अजूनही शिल्लक आहेत. ह्या जमीनदारी, रयतवारी व महालवारी पद्धतीनुसार तेथील जातीव्यवस्थेचे स्वरूपही कमी-जास्त सौम्य, तीव्र एका राज्यातील जातीचे नाव दुसऱ्या राज्यातील त्याच प्रकारचे काम करणाऱ्या जातीशी जुळेलच असे नाही, पण त्यांच्या कामात मात्र एकवाक्यता दिसून येते. जसे उत्तर भारतात असलेले अस्पृश्य 'धेड' हे नाव महाराष्ट्रात नाही. पण उत्तर भारतातून महाराष्ट्रात आलेले (परदेशी, मारवाडी, इत्यादी) शोषक समूह येथील 'महारांना' 'धेड' या नावाने संबोधतात. याचा अर्थ येथील 'महार' व हे शोषक वर्गातील लोक ज्या राज्यातून आले तेथील 'धेड' यांच्या कामाच्या स्वरूपात सर्वसाधारणपणे एकवाक्यता दिसून येते. त्यातून उत्तर भारतातील 'धेड' म्हणजे महाराष्ट्रातील 'महार' होत असा तर्क लावता येतो. कारण त्यांच्या कामाचे स्वरूपही जवळपास सारखेच असते. नावात बदल असला तरी ज्या त्या समूहाच्या कामानुसार, जगण्याच्या पद्धतीनुसार, सामाजिक बंधनानुसार, रुढी-परंपरेनुसार तेथील जातीचे स्वरूप आपल्या लक्षात येऊ शकते. त्याचबरोबर पूर्वी ही जाती व्यवस्था जशी होती तशीच ती आजही कायम आहे असे नाही, तर तिचेही स्वरूप बदललेले आहे व ते सतत बदलत राहणार आहे.

भारतातील सध्याच्या लोकशाही पद्धतीच्या निवडणुकांचा तर या जातीव्यवस्थेवर बराच गंभीर परिणाम होत आहे. आपापल्या जाती संघटित करून जास्तीत जास्त प्रतिनिधी निवडून आणण्यासाठी किंवा आपल्या जातींची मते आपल्याला मिळावी यासाठी, ज्या रीतीच्या संघटनात्मक बाबी केल्या जातात, त्यातून तर ह्या जातीव्यवस्थेचे स्वरूप बऱ्याच प्रमाणात बदललेले आहे व पूर्वीपेक्षाही ते जास्त संघटित व बळकट होत आहे, असे आपल्याला दिसून येते. सध्याच्या अनुभवातून असे म्हणता येते की जो बदल झालेला आहे तो अस्पृश्यतेच्या स्वरूपात बदल झाला आहे. अस्पृश्यता बऱ्याच प्रमाणात कमी झाली असली तरी त्याचा अर्थ जातीव्यवस्था कमी झाली आहे असा होत नाही. जातिव्यवस्था व अस्पृश्यता ह्या तशा भिन्न बाबी आहेत. अस्पृश्यता ही बऱ्याच प्रमाणात जातीव्यवस्थेशी संबंधित असली तरी अस्पृश्यता म्हणजेच जातीयता नव्हे, ही बाब आपण ध्यानात ठेवली पाहिजे.

सध्या ती आयटी क्षेत्रातील विविध शिक्षणाच्या माध्यमातून तसेच नोकरीधंद्यातून सुद्धा दिसून येत आहे. आरक्षणातून शिक्षण घेत असलेल्यांना, नोकरी लागलेल्यांना 'हे कोट्यातून आले आहेत' असे म्हणून त्यांच्याकडे तुच्छतेने बघितल्या जाते. त्यांच्याशी भेदभाव केल्या जातो. अनेक विद्यार्थ्यांना तर या जाचामुळे आत्महत्या कराव्या लागलेल्या आहेत.

तेव्हा समूहांच्या शिक्षणातून, धर्म बदलण्यातून, देशांतरातून, सहभोजनातून किंवा मग आंतरजातीय विवाहातून जशी जातीव्यवस्था नष्ट होत नाही. आधुनिकीकरणातून किंवा नव-उदारीकरणाच्या धोरणातून तिचे स्वरूप बदलते, पण ती व्यवस्था नष्ट होत नाही.

येथे सांगण्याचा मुद्दा एवढाच आहे की जातीव्यवस्था हे केवळ भारताचेच वैशिष्ट्य नाही, तर कार्ल मार्क्स यांनी आशियाई उत्पादन पद्धतीची म्हणून जी काही खास वैशिष्ट्ये सांगितली आहेत, त्यापैकी भारतीय उपखंडातील जातीव्यवस्था हे एक वैशिष्ट्य आहे असे आपण म्हणू शकतो.

(पान क्रं. १६ वर)

# गोपाळबाबा वलंगकर: विचार, कार्य आणि लेखन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गोपाळबाबा वलंगकर यांचा उल्लेख त्यांच्या भाषणातून केलेला आहे, हे सर्वश्रुत आहेच. गोपाळबाबा वलंगकर हे डॉ. आंबेडकर घराण्याचे माता रमाबाई आंबेडकर यांच्या माहेराकडून नातलग होते. लष्करी सेवेतून निवृत्त झाल्यावर अस्पृश्योध्दाराच्या कामासाठी सन १८९० या वर्षी 'अनार्य दोष परिहारक मंडळी' या नावाची संस्था गोपाळबाबांनी सुरू केली.

'कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली महाड येथे दि. १९ व २० मार्च १९२७ रोजी आयोजित केली होती. अध्यक्षीय भाषणात डॉ. बाबासाहेब म्हणाले होते, 'मुंबई इलाख्यातील अस्पृश्य समाजात सार्वजनिक काम करण्याकरिता ज्या संस्था स्थापन झाल्या त्यात 'अनार्य दोष परिहारक मंडळी' ही पहिली संस्था आहे, असे संशोधनातून दिसून येईल.... हे सर्व मी पुराव्यानिशी सांगू शकतो कारण या संस्थेची सर्व कागदपत्रे हल्ली माझ्या ताब्यात आहेत.' पुढे ते असेही म्हणतात, 'ही संस्था रत्नागिरी जिल्ह्यात दापोली येथे स्थापन झाली, त्यावरून उघड आहे की, अस्पृश्योन्नतीची चळवळ प्रथम सुरू केल्याचा मान जर कोणास द्यावयाचाच झाला तर तो या संस्थेस आणि प्रांतास देणे प्राप्त आहे. या संस्थेच्या चालकांनी संस्थेच्यामार्फत फक्त अडचणी दूर करण्याचेच काम केले असे नाही, तर लेखांद्वारे जागृती करण्याचे कामही त्यांनी पुष्कळच केले आहे. सत्यशोधक समाजाचे अध्वर्यू जोतीबा फुले यांच्या खऱ्या साथीदार आणि उत्साही शिष्यांपैकी बरेच या संस्थेच्या चालकांपैकी होते. यापैकी एकाच्या नावाचा उल्लेख केल्याशिवाय माझ्याने राहवत नाही ते गृहस्थ म्हणजे गोपाळबुवा वलंगकर त्यांनी आपल्या लेखनाद्वारे जी जागृती केली ती अनुपम आहे. ज्यांना ती पहावयाची असेल त्यांनी 'दीनबंधू' च्या जुन्या फायली वाचून पाहाव्यात म्हणजे कळेल'. गोपाळबाबा वलंगकर इ.स. १८८६ या वर्षी ब्रिटीश सैन्यातून निवृत्त झाल्यावर जोतीराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीत सक्रिय झाले. प्रस्थापित समाजव्यवस्थेविरूद्ध त्यांनी 'दीनबंधू' पत्रातून लिखाण केले. दीनबंधूच्या १९ जुलै, १८९६ च्या अंकात त्यांच्या सहा अखंडांची माला प्रसिद्ध झाली. हे लिखाण सत्येश्वरदास (काही ठिकाणी-सत्यदास) या नावाने प्रसिद्ध आहे. त्यांनी अनेक विषयांवर बुध्दिप्रामाण्यवादी विचार 'दीनबंधू' मधून व्यक्त केलेले आहेत. २३ डिसेंबर १८९४ च्या दीनबंधूमधील लेखातून हिंदू-मुस्लिमांना शिक्षणाचे महत्त्व सांगून विद्यार्जन करण्याचा सल्ला दिला आहे

स्वत:च्या विवेकबुद्धीने जगाचे अवलोकन करावे, इतरांवर अवलंबून राहू नये, सत्य आणि विवेकाचा शोध स्वत: घ्यावा असा संदेश १९ जुलै १८९६ च्या 'दीनबंधू' तून गोपाळबाबांनी दिला आहे. धर्मशास्त्र आणि शास्त्री पंडितांवर त्यांनी कडाडून हल्ला केला आहे. केशवपनाच्या अमानुष आणि दुष्ट चालीचा त्यांनी 'खाटकाच्या परी' असा उल्लेख केला आहे. विधवांच्या विदारक स्थितीवर आणि त्यांची विटंबना करणाऱ्या धर्ममार्तंडांवर ते हल्ला चढवितात. जातीभेदामुळे देशाचे नुकसान होते, जातीभेद दूर केल्याशिवाय ऐक्य आणि देशहित होणार नाही, असा विचार गोपाळबाबांनी मांडला आहे, (दीनबंधू, ३० सप्टेंबर १८९४). गोपाळबाबा वलंगकर यांच्या अखंडातील सडेतोड लेखन आणि बुद्धिनिष्ठ युक्तिवाद विचारप्रवर्तक आहे. पुरोहितांनी स्वत:च्या श्रेष्ठत्वासाठी कपोलकल्पित भाकडकथा रचून बहुजन समाजावर अन्याय करून ते कनिष्ठ कसे राहतील अशीच रचना केली. परंतु या भाकड कथांमधून ब्राम्हणेतरांनी कसे बाहेर पडावे याची दिशा आणि यातील सत्य अखंडांच्या माध्यमातून स्पष्ट केले आहे, आणि तसे प्रबोधन करण्याचा प्रयत्न गोपाळबाबा वलंगकर यांनी केला आहे. 'उंच व पवित्र वर्णाची उत्पत्ती' या अकरा कडव्यांच्या अखंडातून जातीश्रेष्ठत्वाचा अहंकार कसा खोटा आहे, आणि त्याची उत्पत्ती गौरवास्पद कशी नाही याचा परामर्श गोपाळबाबांनी घेतला आहे. १९ जुलै १८९६ च्या 'दीनबंधू' च्या अंकातील प्रसिध्द झालेले गोपाळबाबांचे 'अखंड' विचारप्रवर्तक आहेतच, शिवाय ते अन्याय आणि समाजस्थितीवर मार्ग काढण्यास प्रेरणादायी ठरतील असेच आहेत

गोपाळबाबा वलंगकर यांच्या अखंडांचा बारकाईने आणि गांभिर्याने परामर्श घेतला तर असे दिसून येते की, त्यात नीतिमत्ता जपणूक, विधवांचा धर्माच्या नावाने होणारा छळ, धार्मिक क्षेत्रातील दलाल-मध्यस्थ यांचा संघटितपणा, जातिभेदामुळे होणारे देशाचे नुकसान, जनतेची लूट इ. बाबींवर प्रकाशझोत टाकला आहे. शेवटच्या अखंडात तर निर्भिड बना आणि कर्मठांना घाबरू नका असे आवाहन ते 'बंधु सुधारक' यांना करतात. कदाचित हा उल्लेख 'दीनबंधू' आणि 'सुधारक' या साप्ताहिकांचा असावा.

गोपाळबाबांचे समाजोध्दाराचे आणि अस्पृश्यता निवारणाचे कार्य पाहून सरकरने त्यांची दखल घेऊन सन १८९५ या वर्षी गोपाळबाबांची महाड लोकल बोर्डात सदस्य म्हणून नेमणूक केली. कदाचित अस्पृश्य समाजातील व्यक्तीला मिळालेला हा पहिलाच सन्मान असेल. गोपाळबाबा वलंगकर यांचे 'सुधारक' आणि 'दीनबंधू' मधून प्रकाशित झालेले लिखाण सनातनी उच्चवर्णीय हिंदूंची कानउघाडणी करणारे आणि पिडित समाजाच्या दुःखाला वाचा फोडणारे आहे. १४ एप्रिल, १८९५ च्या 'दीनबंधू' मध्ये कलेक्टर यांच्या भेटीचा वृत्तांत देताना असे लिहिले आहे की, 'कबजे ओतूर येथे तारीख २ मार्च, १८८५ रोजी मेहरबान कलेक्टर साहेब हे शाळा पाहण्यास आले. 'लोक्याष्ट' म्हणजे महारांची शाळा पाहून नंतर गावातील शाळा पाहण्यास आले.' या वृत्तांतावर गोपाळबाबांनी 'महारी' या नावाने प्रकाशित केलल्या पत्रातून नाराजी व्यक्त केली. ते लिहितात, आजला जिकडे तिकडे लोकाष्ट, लोकाष्ट, लोक्याष्ट म्हणून वीजमंत्रासारखा ध्वनी होत आहे. जसा काय ध्यासच लागला आहे. हा शब्द मराठी कोशातून काढावयास महाप्रयास लागले असतील असे वाटते. कारण नवीन शोध लागत चालले आहेत. 'लोक्याष्ट' व 'महार' या शब्दांचा अर्थ एक होऊ शकत नाही. महार ही संज्ञा वडिलोपार्जित

आहे व ती अद्यापपर्यंत चालत आली आहे. तेव्हा या जातीच्या संदर्भात 'महारी' जर लिहिले तर फार कृपा होईल.' 'वादळाचे वंशज'या पुस्तकात डॉ. गंगाधर पानतावणे यांनी नमूद केल्याप्रमाणे हा मजकूर १४ एप्रिल १८९५ या वर्षीच्या 'दीनबंधू' पत्रात ओतूरहून प्रसिध्द झाला आहे. या पत्राचे पृष्ठ तिसरे कॉलम चौथे ओळ दुसरीत 'लोक्याष्ट' हा शब्द घातलेला आहे. पुढे असाही उल्लेख आहे की, हा 'महारी' दुसरा तिसरा कोणी नसून ते गोपाळबाबाच असावेत असे वाटते. 'महारी' हे 'दीनबंधू' चे वर्गणीदार असल्याचेही नमूद केलेले आहे. टीकाकारांचा गोपाळबाबांनी संयमी परंतु स्पष्ट शब्दांत विरोध केला आहे. या सर्व बाबींचा परामर्श घेतला तर तत्कालीन अस्पृश्यांमध्ये गोपाळबाबांना आद्य पत्रकार म्हणून पहिले स्थान आहे. प्रा. डॉ. सी. एच . निकुंभे यांनी त्यांच्या पुस्तिकेमध्ये गोपाळबाबांनी पंडित कोंडीराम या नावानेही लेखन केल्याचे लिहिले आहे.

गोपाळबाबा 'विटाळ विध्वंसन' हि पुस्तिका लिहिल्याचे सर्वश्रुत आहेच. परंतु २० मे, १८९४ च्या 'दीनबंधू' मध्ये असलेल्या उल्लेखाप्रमाणे त्यांनी आपल्या बांधवांना धर्म म्हणजे काय हे समजावे म्हणून 'हिंदू धर्मदर्पण' या नावाची पुस्तिका लिहिली होती, परंतु ही पुस्तिका आता उपलब्ध नाही. २३ ऑक्टोबर, १८८८ या वर्षी गोपाळबाबांनी 'विटाळ विध्वंसन' ही पुस्तिका लिहून पूर्ण केली.

गोपाळबाबांनी 'विटाळ विध्वंसन' च्या प्रस्तावनेत म्हणतात, 'हे पत्र आम्ही ता. २३ ऑक्टोबर, १८८८ ला तयार करून छापण्यास एक-दोन ठिकाणी पाठविले होते; परंतु त्यांनी ५-७ महिन्यांनी जबाब दिला की, आपले विनंतीपत्र आम्हास मिळाले नाही. म्हणून दुसरी कॉपी करून दुसऱ्या छापखान्यात छापवून घेणे भाग पडले, म्हणून इतका वेळ लागला. 'त्यामुळे पुस्तक प्रसिध्द करतेवेळेसची तारीख ऑगस्ट, सन १८८९ अशी आहे. 'दलितांची वृत्तपत्रे' या ग्रंथात सन १९६२ या वर्षी इतिहासकार आ. श्री. रणपिसे यांनी सन १८८८ यावर्षी 'दलितांचे वृत्तपत्र' निघाल्याचे नमूद केले आहे.

'पुरोगामी सत्यशोधक' या पुण्यातून निघणाऱ्या जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर १९७९ च्या त्रैमासिकात देखील 'गोपाळबाबा वलंगकरांची विटाळ विध्वंसन ही पुस्तिका छापली आहे. या अंकात तत्कालीन कार्यकारी संपादक डॉ. अनिल अवचट यांनी प्रस्तावनेत लिहिले आहे की,'गोपाळबाबा वलंगकर यांनी लिहिलेली (व काळाच्या ओघात गडप झालेली) 'विटाळ विध्वंसन' ही पुस्तिका छापली आहे.'

पुण्यातून श्री गजानन बुक डेपोने प्रकाशित केलेल्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जनतेला उपदेश व गोपाळबुवा वलंगकर यांचे उच्चवर्णीयां विरूध्दचे जगातले पहिले विनंती-पत्रक' यामध्ये या पुस्तिकेचा सर्व भाग आढळतो. विटाळ विध्वंसन मध्ये येथील समाजव्यवस्थेला गोपाळबाबांनी सव्वीस प्रश्न विचारले आहेत, ते अतिशय प्रखर असून पुरावाजन्य दस्ताचा उल्लेखही त्यात केलेला आहे. हे विनंतीपत्र त्यांनी हिंदु धर्माचे मुख्य श्रीमंत जगद्‌गुरू शंकराचार्य श्री. प्रौ. संस्थानिक व सरदार,र. रा. वे. शा. सं.शास्त्री व विद्वान मंडळी, ब्राह्मोसमाज व प्रार्थनासमाज यांचे प्रमुख. ह. भ. प. साधु, संत, महंत व इतर पवित्र हिंदु मंडळी यांचे सेवेत सादर केलेले आहे. त्यावर 'चक्रवर्तिनी' प्रेस मुंबई असा उल्लेख आहे. या पुस्तकाची निर्मिती कशी झाली याचा उल्लेखही त्यात आढळतो.

अस्पृश्यांच्या दयनीय स्थितीची कैफियत कशामुळे झाली यावर सविस्तर विवेचन गोपाळबाबांनी केलेले आहे. ऋग्वेद, अथर्ववेद, तैतिरीय संहिता, कठोउपनिषद, मनुस्मृती, महाभारत, भागवत, विष्णुपुराण, वायुपुराण, स्कंदपुराण, तंत्रशास्त्र, कुलार्णव, गुह्यसंबंध, बौध्दांचा गुह्यसंबंध आणि संस्कृत धर्मग्रंथांचा संदर्भासाठी आधार आहे.

गोपाळबाबांनी विचारलेले प्रश्न समाजव्यवस्थेला निरूत्तर करणारेच आहेत. गोपाळबाबा आपल्या प्रस्तावनेत लिहितात, 'आम्ही जी शास्त्रे व पुराणातील वाक्ये उदाहरणार्थ घेऊन आपल्या सर्वांच्या सेवेत सादर केली आहेत, ती खोटी असून सर्व हिंदु धर्म धर्माभिमानी त्यास मानीत नसल्यास त्या सर्वांचा एक महायज्ञ करून त्यांच्या शास्त्रार्थ पत्र प्रसिध्द करणाऱ्याचा बळी अर्पण केला तरी तो स्वसंतोषाने बळी जाण्यास सिध्द आहे. परंतु अगोदर खरा न्याय करावा.' स्वत:चे बलिदान देण्यास तयार असणाऱ्या गोपाळबाबांचे लिखाण वस्तुनिष्ठ आणि पुरावाजन्य असल्याचे निश्चितपणे सांगता येईल. 'निप:क्षपाती' दीनबंधूमधील, ३० जून १९८९ च्या पत्रात गोपाळबाबांविषयी संपादक महाशया म्हणतात, 'ह्या गृहस्थाने आज सहा वर्षे होत आली, महाराच्या स्पर्शास्पर्शाने महाभ्रष्टता प्राप्त होते, या विषयी कोणत्या देवाची किंवा धर्माची आज्ञा आहे हे समजून घेण्यास पुस्तकरूपाने विनंतीपत्र सर्व जात्यभिमानी व धर्माभिमानी लोकांत प्रसिध्द केले आणि जो कोणी हिंदू हे शास्त्राधारे सिध्द करून दाखविणार नाही, त्यास गोहत्येच्या पापाची शपथ.' अशी वर्तमानपत्रातून सन १८९९ मध्ये तीन वेळा उघड जाहिरात दिली. परंतु त्यावेळेस सर्व लोकांची तोंडे अगदी बंद होती.' यावरून गोपाळबाबांच्या विचारांची ताकद आपल्या लक्षात येईल. या सर्व बाबींचा परामर्श घेतला तर दिसते की, गोपाळबाबा हे कट्टर सत्यशोधक होते; अनेक धर्मग्रंथांचा त्यांनी अभ्यास केला होता, त्यांचे लिखाण हे वस्तुनिष्ठ होते. गोपाळबाबांनी तत्कालीन स्थितीमध्ये विरोधकांना न जुमानता केलेले लेखन आणि कार्य हे अनन्यसाधारण आहे. म. जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेतील एक दुवा म्हणून त्यांचा उल्लेख केला तर ते वावगे होणार नाही असे वाटते. गोपाळबाबा हे तर्कशुध्द विचारवंत, विद्वान आणि लेखक होते. यासंबंधी उपलब्ध साहित्याचा अभ्यास करता, यापुढेही संशोधनात्मक लिखाण व्हावे आणि समाजपरिवर्तनाच्या चळवळीमध्ये कार्य करणाऱ्या सर्वांना वास्तविकता समजावी या दृष्टीने प्रबोधनात्मक कार्यक्रम व्हावेत अशी अपेक्षा आहे. दुर्लक्षित राहिलेल्या अशा सत्यशोधकांना पुन्हा प्रकाशात आणणे ही आजच्या पिढीची जबाबदारी आहे असे मी मानतो. या क्रांतीकारी युगपुरूषाचे निर्वाण सन १९०० या वर्षी झाले, अशा या प्रखर सत्यशोधकास सविनय प्रणाम!

**संदर्भ सूची :**

१. वादळाचे वंशज- गंगाधार पानतावणे

२. आद्य अस्पृश्योध्दारक गोपाळबाबा वलंगकर
प्रा. डॉ. सी. एच. निकुंभे

३. विटाळ विध्वंसन - गोपाळबाबा वलंगकर
प्रस्तावना : रोझलिंड ओ' हॅनलन
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जनतेला उपदेश
५. 'धम्मलिपी' डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेषांक
संपादन : राजा ढाले - रमेश ढावरे
६. सत्यशोधकांचे अंतरंग, संपादक: प्रा. डॉ. ए. उगले
७. सत्यशोधकीय नियतकालिके - अरूण शिंदे
८. सकलजनसंवाद - रा. ना. चव्हाण संपादक : श्री रमेश चव्हाण,

**प्रा. डॉ. धनंजय बांबुराव लोखंडे**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे-४११००७.

---

(पान क्र. ४ वरून)

सिव्हिल ड्रेस मधील पोलिसांमार्फत मारहाण करण्यात आली होती. त्यांच्या भोवती त्या चौकात हिंदुत्ववादी स्त्री पुरुष, युवक युवती जमा होऊन 'भारत माता की जय' च्या घोषणा देत होते. एकंदरीत चौकात त्या तरुणांना अशी होणारी मारहाण ही त्यांचा आनंद द्विगुणीत करीत होती, असेच वाटते. भाजपाला विधानसभेच्या निवडणुकीत अशा प्रकरणांचा फायदा झाला.

हे लोकांना कळत नाही असं नाही. बहुसंख्यांक लोकांना हे चांगलेच कळते. पण हे जे काही चालू आहे ते सर्व आपल्याच बाजूने आहे असे त्यांना वाटते. एक प्रकारे ते अशा न्यायालयीन निकालातून, मुस्लिमांच्या एन्काऊंटर्स मधून अथवा त्यांच्या घरादारावर चालत असलेल्या बुलडोझर्स मधून आसुरी आनंद घेत असतात व त्या आनंदातच ते भाजपाच्या बाजूने मतदान करीत असतात. त्यांच्या महागाई, बेकारी, टंचाई, भ्रष्टाचार इत्यादी सर्व प्रश्नाबद्दल त्यांना बऱ्यापैकी बेफिकीर करण्यात सत्ताधारी पक्ष व वर्ग यशस्वी झालेला आहे.

कार्ल मार्क्स या तत्त्वज्ञाने शासन संस्थेच्या घटकात पोलीस व विविध प्रकारची सैन्यदले, तुरुंग, नौकरशाहीसह न्यायालयांचाही समावेश केला आहे. (नंतरच्या काळात निवडून आलेल्या 'सरकार' या घटकाचाही समावेश करायला पाहिजे.) हे सर्व घटक मिळून ज्या त्या समाज व्यवस्थेची 'शासन संस्था' बनते असे त्यांनी म्हटले आहे. त्याचबरोबर या शासनसंस्थेचे कार्य म्हणजे ज्या त्या समाज व्यवस्थेतील शोषक वर्गाने शोषण करण्यासाठी शोषितांवर दडपशाही करण्याची यंत्रणा म्हणजे 'शासन संस्था' अशी त्याची व्याख्या केली आहे. थोडक्यात 'एका वर्गाने दुसऱ्या वर्गावर दडपशाही करण्याची यंत्रणा म्हणजे शासन संस्था' होय असे त्यांचे प्रतिपादन आहे.

पण वरील विवेचनावरून भारताची सद्य परिस्थितीतील 'शासन संस्था' म्हणजे बहुसंख्यांक हिंदू धर्मियांची अल्पसंख्यांक मुस्लिमादी धर्मीयावर दडपशाही करण्याची यंत्रणा म्हणजे 'भारतीय शासन संस्था' होय, असे आपणाला म्हणता येईल काय?

# संघटना बांधणी चिंतन - भाग २

**संघटना कशी चालते?**

याचं एक नेमकं उत्तर आहे. विचाराने प्रेरित होऊन सातत्याने कृतिशील असलेल्या कार्यकर्त्यांच्या बळावर संघटना चालते. याचा अर्थ विचार आणि कृती या दोन्ही पातळीवर सजग असलेले कार्यकर्ते कुठल्याही संघटनेचे आधार, ऊर्जा, बळ असं सर्व काही असतात.विचार आणि कृती दोन्ही गोष्टी तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत.विचार नसताना कृती करण्याचा प्रयत्न केला तर ती चुकीची,अपुरी, दिशाहीन, अर्थहीन ठरण्याची शक्यता असते आणि कृती नसताना केवळ विचार मांडत राहिलो तर ते एक अनुत्पादित कार्य ठरते, ज्याचा संघटनेला फारसा उपयोग नसतो. ते केवळ वैचारिक मैथुन ठरते. म्हणून कोणत्याही संघटनेसाठी विचार आणि कृती दोन्ही पातळीवर कृतीशील असणारी माणसं फार महत्त्वाची असतात.

प्रमुख कार्यकर्त्यांवर म्हणून ही जबाबदारी असते की आपल्या कार्यकर्त्यांना संघटनेचा विचार नीट समजावून देणे, त्यासाठी सातत्याने त्यांची प्रशिक्षणं घेत राहणे,नियमितपणे वैचारिक साहित्याची निर्मिती करणे,वैचारिक चर्चा घडतील याची तजवीज करणे आणि दुसऱ्या बाजूला आपल्या प्रतिभा वापरून सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रमांची आखणी करणे, त्या आखणीसाठी सामूहिक चर्चा घडवून आणणे, त्या उपक्रमात कार्यकर्त्यांचा सहभाग मिळवणे, त्यांना रोल देणे, भूमिका देणे. नंतर झालेल्या उपक्रमाचे सर्वंकष मूल्यमापन करणे, काय घडले, काय चुकले समजून घेणे, दुरुस्त करणे. हे नेतृत्व करणाऱ्या माणसाला निराश न होता,सातत्याने करीत राहावे लागते.

काही वेळा असे होऊ शकते की, विचार करणारी माणसं आहेत पण प्रत्यक्ष काम करण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नाही. हे वास्तव देखील काहींच्या बाबतीत समजून घ्यायला हवे. त्यांचाही योग्य पद्धतीने उपयोग संघटनेसाठी करता यायला हवा. पण संघटनेसाठी वेळ देणारा कार्यकर्ता हा अधिक महत्त्वाचा आहे. कारण प्रयत्न केल्यावर संघटनेसाठी पैसा मिळेल, ज्ञान मिळेल, पण वेळ मिळवणे फार कठीण असते. अशाप्रकारे संघटनेसाठी वैचारिक आणि वेळेची गुंतवणूक करणारे कार्यकर्ते हे संघटना चालवीत असतात. ज्या संघटनेत अशा कार्यकर्त्यांची मांदियाळी आहे, त्या संघटनेचे भविष्य उज्ज्वल आहे.

**-विनायक सावळे**

**चां. भ. खैरमोडे लिखित**
**डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड १ ते १२**
खरेदीसाठी संपर्क साधा :
**विजय नागटिळक -९९२२०६३४०९**

# इतिहास पुनर्लेखन मिथकावर नव्हे तर तथ्यावर हवे

देशातील महत्त्वाच्या घटनांचे कालक्रमानुसार तथ्यात्मक वर्णन व तिचे स्पष्टीकरण म्हणजे इतिहास होय. इतिहास हा कल्पनांचा बाजार नसतो, तर त्याची निर्भरता ही पुराव्यावर आधारित असते. जिथे पुरावे नसतात तेथे 'असे म्हटल्या जाते, अशी प्रथा आहे' अशा वाक्यांनी पडदा टाकला जातो. असे कंगोरे इतिहासाच्या चौकटीत बसणारे नसतात. परंतु दुर्दैवाने आपल्या देशात असेच चालत आले आहे. यालाच मिथके म्हणतात. या मिथकांना पुराव्यांची, प्रत्यक्ष चाचपणीची वा सत्यस्थितीची गरज नसते.

आपल्या देशात 'इतिहासाचे पुनर्लेखन' या नावाखाली शालेय अभ्यासक्रम बदलविण्यात येत आहे. जुने न काढता त्यात अधिक भर टाकणे हे समजण्यासारखे आहे. इतिहासाचे पुनर्लेखन याचा अर्थ आजपर्यंत शिकविला जाणारा इतिहास नकली वा बनावट होता असे मानायचे का? नवी उत्खनने, स्मारके, अभिलेख व शिक्के अशी जुनी तथ्यात्मक साधने सापडल्यास त्यांची इतिहासात भर घालून इतिहास अधिक समृध्द करता येतो. परंतु इतिहासाला मिटवून त्याचे पुनर्लेखन करता येत नाही. परंतु तसे झालेच तर अशा इतिहास पुनर्लेखनात काल्पनिक, असत्य घटनांचा अंतर्भाव करून आपापल्या सोयीची मांडणी करण्याचा धोका संभवत असतो.

इतिहासाचे लेखन करण्याची सुरुवात सुमेर (दक्षिण मेसोपोटेमिया) येथे इ.स.पूर्व ३१०० वर्षात झाली. भारतात कल्हण लिखित राजतरंगिणीच्या पूर्वार्धात ऐतिहासिक ग्रंथांचा अभाव दिसतो. ज्या काळात लेखनकलाच अवगत नव्हती त्या काळाच्या आधारहीन घटनांना इतिहास म्हणून स्वीकारणे ही अयोग्यतेच्या श्रेणीत मोडणारी बाब आहे. पाषाणकाळापासून इसवी सन पूर्व चौथ्या शताब्दीपर्यंत भारतात लेखनकला व तिच्या साधनांचा अभाव होता. भारतात सिंधू सभ्यतेच्या अस्तित्वाचा पुरावा जसा उत्खननातून मिळतो तसा आर्य संस्कृतीच्या अस्तित्वाचा पुरावा दिसत नाही. बऱ्याच काळानंतर तो लिपिबध्द केला गेल्यामुळे आर्य संस्कृतीचे पुरावे भूगर्भाच्या आत दिसत नाही.

भारतातील प्राचीन अभिलेख हे दगडावर कोरलेले असून ते मुख्यत: ब्राम्ही व खरोष्ठी भाषेत आहेत. भारतात असे अभिलेख (शिलालेख, स्तंभलेख,गुहालेख इत्यादी) लिहिण्याची परंपरा ही सम्राट अशोक काळापासून सुरु झाली. एशिया माईनरच्या बोगाज कोई अभिलेखावरून (Bogaz-Koi inscription) इ. स. पूर्व १४०० च्या आसपास आर्यांचे क्षेत्र व वैदिक वेदाची माहिती मिळते. तसेच डेरीयसच्या (इ.स.पूर्व ५२२-४८६) नक्ष-ए-रुस्तम अभिलेखावरून आर्य पुढे सरकत उत्तर पंजाबमध्ये आल्याचे कळते. मिश्रमधील एल-अमरना येथे मिळालेल्या मातीच्या मोहरांवर कोरलेल्या बेबिलोनिया शासकांची नावे आर्यांच्या नावाशी साम्य दाखवतात. यावरून आर्यांच्या मूळ स्थानांचे अनुमान काढता येते.

राष्ट्रीय दृष्टिकोनातून इतिहास पुनर्लेखन हवे असा हव्यास सध्या चालू आहे. इतिहास हा केवळ राष्ट्रीय दृष्टिकोनातूनच नव्हे तर आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनातूनही विद्यार्थी व समाजापुढे मांडला पाहिजे. कारण हे स्पर्धेचे जग आहे, म्हणून इतिहास हा प्राचीन व अर्वाचीन स्थितीमधील शिकविला गेला पाहिजे. हे खरेही आहे इतिहास ही सत्य घटनेची परिभाषा असते. परंतु तथ्य व ऐतिहासिक साधनांशिवाय काही गोष्टी इतिहास म्हणून बळजबरीने घुसडणे व खऱ्या ऐतिहासिक दस्तऐवजाना बाहेर फेकून देणे हे इतिहासाच्या मापदंडात बसणारे नसते. खरा संघर्ष इथे आहे.

भारताला १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर भारतीय इतिहासकारांनी इतिहास लेखन केले. या इतिहास लेखनात साधने म्हणून ब्रिटीशांनी केलेले संशोधन (उत्खनन, सर्वेक्षण, अभिलेख, शिक्के) व पाश्चात्य देशातून आलेले युनानी तथा रोमन लेखक, चिनी लेखक (इत्सिंग, फाह्यान, ह्यूनत्संग) व अरब लेखक अल्बेरुनी सारख्या प्रवासी लेखकांच्या दस्तावेजांचा वापर झाला. याबरोबरच वैदिक, बौध्द व जैन सारख्या धार्मिक साहित्याचा सुध्दा साधने म्हणून वापर झाला. परंतु या धर्माच्या साहित्यातील संपूर्ण लेखदर्शनाला इतिहास म्हणता येत नाही. कारण यात अतिरंजित, काल्पनिक व स्थितीनिरपेक्ष घटना आहेत. बौध्द व जैन धर्माशी निगडीत वास्तू जमिनीखालील उत्खननात सापडतात. परंतु वैदिक धर्मासंबंधी तसे कुठेही दिसत नाही. त्यामुळे वैदिक साहित्यापैकी काहींची निर्मिती आर्यांच्या मूळ वस्तीस्थानात निर्माण झाली असावी तर उर्वरित साहित्य भारत प्रवेशानंतर लिहिले गेले. काही वैदिक साहित्यात तर्काधिष्ठित गोष्टी सापडत नसून त्या अतिरंजित, अवैज्ञानिक व विश्वास न बसण्यासारख्या काल्पनिक वाटतात. म्हणूनच यातील संबंधित बाबींना इतिहास मानता येत नाही.

ज्या राष्ट्रवादाच्या नावे इतिहासाचे पुनर्लेखन घडवून आणायचे आहे, तो राष्ट्रवाद धर्मसंकल्पनांवर आधारित व्यवस्था आणि दैवतीकरणाचे पुनरुज्जीवन करणारा नसला पाहिजे. एकाच राष्ट्रात राहणाऱ्या अनेकविध लोकांच्या सांस्कृतिकीकरणाच्या प्रक्रियेतून समभावनेने एकमेकात रमण्यासाठी, सहजीवन जगण्यासाठी आणि आपापसात एकोपा कायम राखण्यासाठी निर्माण झालेली व्यवस्था म्हणजे 'राष्ट्रवाद' होय. अशा राष्ट्रवादाचे प्रतिबिंब राष्ट्रीय शिक्षणात उमटले पाहिजे. ज्या राष्ट्रवादाच्या नावाखाली द्वेषवाढ, विषमता, पूर्वगौरव व दैवतीकरणाच्या सोबत हिंसा घडविली जाते, तो निश्चितच राष्ट्रवाद नसतो, तर ती राष्ट्रवादाचा द्वेषपूर्ण 'शब्दच्छल' करून सतत सत्ताधारी बनून राहण्यासाठीची किमया असते. सत्तेच्या हव्यासापोटी जनतेची फसवणूक करीत राहणे हे छद्म राष्ट्रवाद्यांचे अंतिम ध्येय असते. छद्म राष्ट्रवादी हे सुधारणांचे, समतेचे व बहुविध संस्कृतीचे शत्रू असतात.

इतिहास हा छद्म राष्ट्रवादाने प्रभावित न होता, तो सत्य घटना, तथ्य, तर्कशीलता व खऱ्या मूल्यांकनाशी संबंधित असला पाहिजे. हल्लीचे युग विज्ञानाचे, नवनव्या अभियांत्रिकीचे, सूचनांचे व कृत्रिम बुद्धिमत्तेचे (Artificial Intelligence) आहे. जगातील इतर देश आधुनिक विचार

स्वीकारून उन्नत होऊ लागले आहेत. आपला देश व जनतेनेही यात मागे राहता कामा नये याचा विचार व्हावयास हवा. पुराणातील वांगी बाहेर काढून देशाच्या तरुण पिढीला मागासलेपणात ढकलण्याने देश प्रगत व सुधारणावादी कसा होईल, याचा विचार झाला पाहिजे. त्याऐवजी संपूर्ण भारतीय राज्यघटनेचे विविधांगी भाग, विवेक व विज्ञानवाद अभ्यासक्रमातून तरुण पिढीला व जनतेला शिकविल्यास ते त्यांच्या अधिकाराप्रती जागरूक होतील आणि त्यातील दंडसंहिता व शिक्षेचे प्रावधान वाचून देशातील गुन्हेगारी कमी होत देशात आनंददायित्व वाढेल.

ब्रिटिशांनी आपल्या शिक्षणपद्धतींतून भारताच्या इतिहासाची मोडतोड केली आणि त्यात विकृती, विसंगती, मिथके आणि तथ्यहीन घटनांचा समावेश केला, या आरोपात तथ्य नाही. याउलट भारतीय संस्कृतीने विवेकवादावर पडदा टाकीत मिथके, विकृती, विसंगती, अंधविश्वास, वर्णव्यवस्था, जातीयवादाचा पुरस्कार करीत स्त्रिया व बहुजनांना खालच्या दर्जाचे मानून हीन वागणूक दिली. त्यांच्या शिक्षणाच्या संधी हिसकावून घेतल्या. हे सर्व बघूनच जेम्स मिल व विलियम आर्चर सारख्या लेखकांनी भारतीय संस्कृतीवर टीका केलेली दिसते. या विसंगतीवर मात करण्यासाठी रानडे, ज्योतीराव फुले, लोकहितवादी, आगरकर व रा.गो.भांडारकर यांनी विषमतापूरक पूर्वगौरववादी संस्कृतीला तिलांजली देत तथ्य पूर्ण, तर्कशील व सुधारणावादी इतिहासाचे रोपण केले.

शहराची व रस्त्यांची नावे बदलणे हा क्रांतिकारी विचार नसून तो इतिहासाच्या पाउलखुणा पुसण्याचा जघन्य प्रकार होय. इतिहासच बदलायचा आहे तर मग भारताचे पूर्वीचे असलेले 'जम्बुद्वीप' हे नाव ठेवण्यात आले पाहिजे. सनातनवादी व पूर्वगौरववाद्यांना राष्ट्रवादाचे प्रवक्ते संबोधणे हा येथील बहुजन जनतेचा अपमान करण्यासारखे आहे. राष्ट्रवादाच्या नावाखाली रामजन्मभूमीचे आंदोलन उभे केले, परंतु अयोध्येत झालेल्या उत्खननात रामजन्माचे काय पुरावे मिळाले हे अजूनही जनतेला कळू दिले नाही. उत्खननात मिळालेल्या वस्तूंचे प्रदर्शन का नाही भरविले? याला विवेकवाद म्हणावा की मिथ्यावाद हे जनतेला कळले पाहिजे.

भारत हा आक्रमित झालेला देश आहे. भारतावरील आक्रमणाची सुरुवात आर्यापासून होत होत ती शक, हूण, इस्लाम व ब्रिटिशांपर्यंत पोहोचते. यातील प्रत्येक शासनकर्त्यांनी येथे आपली प्रतीके रोवली. मात्र या प्रक्रियेमध्ये मूळ भारतीयांची मूळ ओळख हरवलेली आहे. तिला शोधायचे झाल्यास जंगलात, दऱ्यात, डोंगरात, लेण्यात, गुहेत, जमिनीखालील उत्खननामध्ये शोधली पाहिजे. तीच खऱ्या भारतीय इतिहासाची कहाणी आहे. हेच खऱ्या इतिहासाचे पुनर्लेखन ठरेल. हे करण्यास तथाकथित इतिहासबदलू आपला बुद्धिप्रामाण्यवाद दाखवतील काय?

**बापू राऊत**
९२२४४३४३४६
bapumraut@gmail.com

# संघटना बांधणी चिंतन - भाग ३

काम करण्याच्या तीन पद्धती असतात.एकट्याने काम करणे, दुसरी समूहाचा सदस्य म्हणून काम करणे आणि तिसरी पद्धती ही समूहाचा नेता म्हणून काम करणे. या तिन्ही पद्धतीने काम करणारी माणसं संघटनेमध्ये असतात. यात परिस्थितीची गरज म्हणून एकट्याने काम करणे हे समजून घेता येईल, पण संघटना प्रवाही ठेवण्यासाठी ते उपयोगाचे नसते. संघटना वाढीसाठी समूहात काम करणे,तो समूह सातत्याने प्रवाही राहणे, म्हणजे त्यात सातत्याने नव्या नव्या माणसांची भर पडत राहणे, नव्या नव्या माणसांना भूमिका मिळत राहणे, जुन्या माणसाने आपली नवीन कार्यक्षेत्रे शोधणे, किंवा आपल्या कामाचा विस्तार करणे आणि नव्यांना संधी देणे असे करत राहणे आवश्यक असते. वर्षानुवर्षे एकच व्यक्ती चमत्कार करतोय, भाषण करतोय किंवा लिहितोय हे कितीही छान असले तरी संघटनेच्या वाढीला अडथळा ठरण्याची शक्यता असते.

इथं सतत नवीन माणसं यायला हवीत, त्यांना संधी आणि भूमिका द्यायला हवी. प्रसंगी काम कमी दर्जाचे झाले तरी चालेल किंवा चुका झाल्या तरी चालतील पण माणसांना रिप्लेस करणे फार आवश्यक असते. हे रिप्लेसमेंट कधी,कसे, कोणाचे याबद्दल व्यापक संघटनात्मक समज असावी लागते. संघटनेची वाढ आणि विस्तार हा प्रामाणिक हेतू जर असला तर हे योग्य पद्धतीने करता येते.

आपल्या शाखेत,आपल्या गटात वर्षानुवर्ष तीच तीच माणसं दिसत असली तर समजावे आपल्या संघटनेची वाढ खुंटली आहे. एकच गट कितीही प्रभावी काम करीत राहिला तरी ती प्रायव्हेट लिमिटेड कंपनी होते. आपण कंपनी नाही तर संघटना आहोत. आणि संघटनेत सातत्याने नवीन चेहरे येत राहणे आवश्यक असते. अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम हे शेकडो वर्ष चालणारे काम आहे. या शेकडो वर्षातल्या शृंखलेची आपण केवळ एक कडी आहोत. आपल्या मागे देखील काही कड्या होत्या आणि आपल्या पुढे देखील काही कड्या असणार आहेत. ही भावना मनात जर सतत जागृत ठेवली, तर रिप्लेसमेंट खूपच खिलाडू पद्धतीने होत राहते, संघटना वाढत राहते, मोठी होत राहते.

**विनायक सावळे.**
९४०३२५९२२६.
vinayak.savale123@gmail.com

**वृत्तांकन पाठवावे**

आपल्या परिसरात परिवर्तनवादी चळवळींच्या संदर्भातील घडलेल्या कार्यक्रमांचे सविस्तर वृत्तांकन सुगावा अंकात छापण्यासाठी पाठवावे.

# सहसंवेदना जागवणारा, सुख-शांती-समाधानाचा संदेश देणारा रमझानचा महिना.

जगातील मानव जातीला कोरोनाने दोन वर्षापूर्वी जमिनीवर आणून सोडले होते. जात धर्म, प्रांत, भाषा, वेशभूषा, गरीब श्रीमंत उच्च, नीच सर्व एकाच खाटेवर झोपण्यास मजबूर केले होते. माणसांनी माणसावर प्रेम करावे, द्वेष भावना ठेवू नये, शक्यतो एकमेकांना मदत करावी हेच शिकविले होते. माणूस कोणत्याही जातीधर्माचा, राज्याचा, प्रांताचा असो, त्यांच्याशी प्रेमाने बोलावे, त्यांच्या सुख-दुःखाची काळजी घ्यावी, कोणताही धर्म 'नफरत करा' असे सांगत नाही. प्रत्येक धर्मामध्ये शांतीचा संदेश देणारे सण आहेत. त्यासाठी त्यांना त्या दिवसात चांगले काम व विचार करण्यासाठी मानसिक व शारिरिक दृष्ट्या तयार केल्या जाते. हिंदू धर्मातील सहा हजार सहाशे जातींना हिंदू म्हणून एकत्र ठेवतात आणि विजय, पराजयाचे दिवस मोठ्या संख्येने सण म्हणून साजरे करण्यास त्यांना भाग पडतात. जसे कि श्रावण का पाळतात. त्या महिन्यात पोथ्या, पुराणे, धर्म ग्रंथ वाचतात. काही आठवडे सोमवार कडक उपवास ठेवतात, दाढीसुध्दा करीत नाही. नंतर गटारी अमावास्या साजरी करतात. बौद्ध धम्म मानणारे लोक वर्षावास तीन महिने पाळतात. तेव्हा बुद्ध आणि त्यांचा धम्म, मिलिंद प्रश्न, त्रिपटक सारखी ग्रंथ सामुदाहिक पणे वाचतात. नंतर धम्माला शरण जातात, पण संघाला संघटनेला शरण जात नाही. म्हणजेच पंचशिलेचे पालन करीत नाहीत. असाच मुस्लिम समाजातील रमजान महिना असतो. तो समाजाला शांती, समता व स्वातंत्र्य मिळवून सन्मानाने जगण्याचा मार्ग दाखवितो, त्यासाठी कडक उपवास म्हणजे रोजा पकडला जातो. प्रत्येक धर्माचे हे सण मोठ्या संख्येने साजरे केले जातात. तेच सण दरवर्षी नवीन प्रेरणा घेऊन येतात. तरुणांना धार्मिक रीतीरिवाज, संस्कार, सांस्कृतिक वारसा देऊन जातात.

श्रावण महिन्यात, वर्षावासात आणि रमजान मध्ये लहान मुलामुलींना धर्माचे संस्कार व सांस्कृतिक कार्याची माहिती दिली जाते. चांगला नागरिक बनण्यासाठी या महत्वाच्या गोष्टी लक्षात घेतल्या तर त्याला जात,धर्म प्रांत, भाषा,वेशभूषा कोणीच अडवू शकत नाही. म्हणूनच रमजान हा केवळ इस्लाम मानणारा मुस्लिम समाज व मुसलमान हेच साजरा करू शकतात असे नाही. माणूस बनण्यासाठी चांगले गुण माणसाच्या आचरणात असले पाहिजे. इथे दोन उदाहरणे देतो. एक देशाचा राष्ट्रपती, दुसरा सरन्यायाधीश. विचाराने, अधिकाराने खूप मोठ्या पदावर विराजमान होते, पण आचाराने गुलाम झाले.

पंचशिलेचे पालन करणारा कोणीही असू शकतो. इस्लाम मध्ये सांगितलेल्या पाच कर्तव्याचे पालन करणारा कोणीही असू शकतो. माणसाला माणसासारखे वागविण्याची शिकवण देणारा धर्म व धम्म जगात ओळखला जातो. जो माणसासोबत माणसासारखा वागत नसेल तर तो माणूस असू शकत नाही. म्हणूनच माणसं ओळखण्यासाठी धर्माची धम्माची शिकवण मुलामुलींना लहानपणापासून दिली पाहिजे. सर्वच मुस्लिम मुसलमान नाहीत. जो मुसलमान पाच कर्तव्याचे पालन करत नसेल तो इस्लाम मानणारा असू शकत नाही. इस्लाम मानणारा मुस्लिम इमानदार, नमाज पडणारा, रोजा ठेवणारा, हज करून आलेला आणि न चुकता समाजाच्या उन्नतीसाठी जकात दरवर्षी भरणारा असतो. म्हणूनच त्यांची मशिद, कब्रस्थान आणि मदरसा प्रत्येक ठिकाणी असते. तेच त्यांना स्वाभिमानी धर्माचे पालन करणारे बनविते. त्यांची रीतसर नोंद असते. म्हणूनच ते कट्टरपंथीय आणि संघटीतपणे आदेशाचे पालन करणारे असतात.

मानव प्राण्यावर नेहमी प्रेम करतो, सहानुभूती दाखवितो आणि नियमितपणे सहायता करतो. कोरोनाच्या काळात सर्वानाच देवा धर्माच्या मंदिर, मशिदी, चर्च, विहार, गुरुद्वारा पेक्षा दवाखाना किती महत्वाचा होता याची जाणीव झाली होती. त्यात डॉक्टर, नर्स, टेक्नीशयन प्रशिक्षित असले पाहिजेत. डॉक्टर नर्स एवढेच वार्डबॉय, आया, मावशा यांची कामे लक्षवेधी असतात. त्याकाळात त्यांच्या सकारात्मक आणि नकारात्मक विचारांचे प्रतिबिंब त्यांच्या आचरणातून दिसून आले होते. कोरोनामुळे सर्व सरकारी दवाखाने प्रमाणापेक्षा जास्त संख्येने भरलेले होते. डॉक्टर, नर्स, वार्डबॉय, आया, मावशा कामगार कर्मचारी कोणतेही कारण सांगून सुट्टी घेऊन जबाबदारी टाळत नव्हते. आठ दिवस घरी जाण्यास मिळाले नाही, शांततेची झोप नाही. तरी रुग्णाची मानव सेवा करीत होते. कारण त्यांनी कामावर लागतानाच तसे लिहून दिलेले असते. मी पैसे कमविण्यासाठी नोकरी करीत नाही तर समाजाला, देशाला सेवा देण्यासाठी नोकरी करतो. खाजगी दवाखान्यातील डॉक्टर नर्स, वार्डबॉय, आया, मावशा यांच्याकडून आपण कोणतीही अपेक्षा ठेवू शकत नाही. ते मिनिटाला तासाला पैसे वसूल करत होते. कोरोनाने सर्वच माणसाला खाजगी आणि सरकारी यातील फरक ठळकपणे दाखवून दिला होता. त्याचबरोबर श्रद्धा, अंधश्रद्धा, अज्ञान आणि विज्ञान यातील महत्व शंभर टक्के पुराव्यानिशी सिद्ध करून दाखविले होता.

रमजान मध्ये रोजा पकडणे म्हणजे सर्व वाईट कामावर सवयीवर विजय मिळविण्यासाठी तयार करणे होय. रोजा पकडला असेल तर वाईट मार्गापासून दूर राहिले पाहिजेच व वाईट लोकांच्या जवळपास थांबायला मनाई असते. रोजा जेव्हा पकडला जातो तेव्हा तहान भूक काय असते याची त्यांना जाणीव होते. त्यामुळेच भुकेल्या तहानलेल्या माणसाला पाहून रोजा पकडणाऱ्याच्या मनात दया उत्पन्न होते. सकारात्मक विचाराचे मनात घर पक्के होते. त्यातूनच दान करण्याची इच्छा निर्माण होते. त्यामुळे पुण्य लाभते, मनाची एकाग्रता लाभते. उत्पन्नात मोठी वाढ होते. रोजा सुरू असतानाच वर्षभराची जकात भरली जाते. रोजा पकडणाऱ्या व्यक्तीबद्दल समाजात आदर निर्माण होतो. खोटे बोलून फसवणूक करणे, हिंसा करणे, निंदा,चुगली करणे, भ्रष्टाचार करणे यापासून दूर राहण्याची प्रेरणा मिळते. म्हणूनच एक महिन्याच्या रोजात या सर्व वाईट गोष्टींपासून वर्षभर दूर राहण्याची प्रतिज्ञा घेतली जाते. कुराणामध्ये अल्लाने सांगितले

आहे की रोजा स्वतःला शुद्ध विचारांचा पाईक करण्याची पहिली पायरी आहे. त्यामुळे तुम्ही वाईट कामापासुन स्वतःचे रक्षण करू शकता, त्यापासून दूर राहू शकता. अल्ला-खुदा चे अस्तित्व मान्य करा, त्यांची मनात आदरयुक्त भीती निर्माण करा. त्यामुळेच सर्व क्षेत्रातील मुसलमान अमीर, गरीब, उच्चशिक्षित, अडाणी मशिदीत एक लाईनमध्ये नमाज पडायला उभे राहतात. जो जसा येईल तो तसाच लाईन मध्ये उभा राहून नमाज पडतो. त्यांच्या मनातील सर्व विकार नष्ट होऊन विनम्रपणे तो सर्वांच्या मध्ये उभा राहतो तेव्हा तो फक्त पाच कर्तव्ये पार पाडणारा माणूस असतो. म्हणूनच तो सहसंवेदना जागवणारा, सुख-शांती-समाधानाचा संदेश देणारा रमझानचा महिना असतो.

मशिदीत सर्व सामान असतात. सर्वांना सामान स्वातंत्र्य व अधिकार असतात. हिंदूंच्या मंदिरात असे पाहण्यासाठी मिळेल काय? ब्राम्हण सर्व श्रेष्ठ. जास्त पैसे देणारा दानशूर समाजसेवक, मग तो किती भ्रष्ट मार्गाने पैसे कमावणारा असो, तो मोठा भक्त ठरतो. हिंदू धर्मात वर्णाला महत्व आहे. ब्राम्हण-बनिया सर्वश्रेष्ठ असतात, बाकी क्षत्रिय, शूद्र, अतिशूद्र असतात. मग ते कितीही शूरवीर, कलाकौशल्य निपुण असले तरी ते समता,स्वातंत्र्य व अधिकारांचे हकदार नसतात. देशाचा राष्ट्रपती सुद्धा नाही. हेच संस्कार व सांस्कृतिक शिक्षण लहानपणापासून असल्यामुळे मोठे झाल्यावर ही मुलंमुली उच्चपदस्थ अधिकारी झाल्यावर लोकशाही, मानव अधिकार किंवा माणसाला माणसासारखे पाहण्याचा दृष्टिकोन त्यांच्यात नसतो. वर्णव्यवस्था त्यांच्या मनात व मेंदूवर कायमस्वरूपी नियंत्रण ठेवते. त्यामुळेच त्यांना देशातील सर्व मुसलमान गुन्हेगार वाटतात. जे व्यभिचार,चोरी, मारामारी, भ्रष्ट मार्गाचा अवलंब करतात ते अल्लाने सांगितलेल्या पाच कर्तव्ये मानणारे नसतात. म्हणूनच ते स्वतः बरोबर मुस्लिम समाजातील पाच कर्तव्ये इमानदारीने पार पाडणाऱ्या समाजाला बदनाम करतात.

रोजा पकडणारा एका वर्षी रोजा पकडला तर जिवंत असेपर्यंत रोजा पकडतो. आरोग्य ठीक नसेल, शरीर साथ देत नसेल, तरी तो नमाजाच्या वेळी जिथे असेल तिथे डोळे बंद करून हात जोडून आपले कर्तव्य पार पाडतो. आजूबाजूला कोणतेही वातावरण असू द्या त्याला त्यांच्या कर्तव्यापासून कोणीच रोखू शकत नाही. म्हणूनच रमजान महिन्यातील रोजा हा कोणाविषयीही मनात कटुता न ठेवता साऱ्यांप्रती प्रेमभावना व्यक्त करण्याचे हे दिवस असतात. 'प्रेम दिल्याने वाढते' असे म्हणतात. त्यामुळे या सणाच्या माध्यमातून विविध धर्मीयांमध्ये प्रेम वाढीस लागावे, अशी अपेक्षा असते. डिजिटल इंडिया, स्मार्टफोनच्या आजच्या वातावरणात ती आता काळाची गरज ठरू पाहत आहे. यातूनच विश्वबंधुत्वाची संकल्पना प्रत्यक्षात येण्यास मदत होणार आहे. रोजे म्हणजे फक्त उपवास किंवा उपाशी राहणं नव्हे, तर या काळात रोजेदाराने काही मानसिक आणि व्यावहारिक नियम पाळणेही बंधनकारक असते. रमझानच्या काळात डोळे, कान आणि तोंडाचा चुकीचा वापर वर्ज्य आहे. म्हणजेच वाईट ऐकणे, बघणे किंवा बोलणे या तिन्ही गोष्टींना या काळात मनाई असते. रोजा म्हणजे रोखणे. परंतु या काळात केवळ तहान-भूक या गोष्टींवरच नियंत्रण आणले जाते असे नाही तर अनेक चुकीच्या गोष्टी कायमस्वरूपी दूर फेकण्याची प्रेरणा देऊन जाणारा महिना किंवा वार्षिक उत्सव असतो. आता त्यात चांगले घेणारा चांगलेच घेणार ! वाईट विचार करणाऱ्या माणसाला तुम्ही कितीही चांगले सांगा, तो या कांनाने ऐकणार व दुसऱ्या कानाने सोडून देणार. कोणत्याही चांगल्या कामाची सुरुवात स्वत:पासून करावी लागते. मग श्रावण महिना असो की वर्षावास असो. रमजान महिन्यातील रोजा तो स्वतःला करावा लागेल. तेव्हाच त्यांचे महत्व समजून घेता येईल.

रोजा पकडण्याच्या काळात गरीब, निराधार व्यक्तींची मदत करण्याला मोठे महत्त्व असते. आपण जो आहार घेतो तोच आहार या व्यक्तींनाही दिला जायला हवा म्हणून रोजा एकटा माणूस कधीच सोडत नाही. तो सर्वांना सोबत घेऊन सोडला जातो. या काळात प्रत्येक मुस्लीम धर्मीयाने सदाचारी वर्तन ठेवणे बंधनकारक आहे. म्हणूनच तर समाजातील सर्व घटकांना गोरगरीब, कष्टकरी, फेरीवाले, रिक्षावाले सार्वजनिक ठिकाणी सार्वजनिक रोजा सोडण्याचा टेबल लावतात. येणारे जाणारे त्यांच्या कडे कौतुकाने पाहतात. कारण हा रोजा घराच्या चारभिंतींच्या आत होणारा व्यक्तिगत सण नाही, तर समाजाला योग्य मार्ग दाखविणारा राष्ट्रीय पातळीवर संस्कार देणारा सण आहे. या काळात खोटे बोलणे, बदनामी करणे, एखाद्याच्या पाठीमागे त्या व्यक्तीबद्दल अनुद्गार काढणे, खोटी शपथ घेणे आणि लोभ धरणे या गोष्टींमुळे रोजाचे फळ मिळत नाही. उपवासांसोबतच मानसिक आचरण शुद्ध ठेवणं रमजान काळात गरजेचे असते. दानधर्माचे महत्त्व अधोरेखित करणारा रमझानचा महिना आणि ईद-उल-फित्रचा सण मुस्लीम धर्माचे पालन करणाऱ्या प्रत्येकासाठी मानवतेची अनोखी शिकवणच आहे.

भारतात सर्व धर्मांचा आदर केला जातो, म्हणून तो जगात सर्वधर्मसमभाव मानणारा देश म्हणून ओळखल्या जातो. सहा हजार सहाशे जातीत पोटजातीत धर्मात विभागलेला हा माणूस म्हणून भारतात गुण्यागोविंदाने राहतो, जगतो. काही अपवादात्मक लोक समाजाच्या शांतीला सुरुंग लावुन आग लावण्याचे काम करतात. त्यात काही प्रमाणात ते यशस्वी होतात पण ते जास्त दिवस टिकत नाही. म्हणूनच आपल्या आजूबाजूला कोणत्या धर्माचा माणूस राहतो तो त्या धर्माच्या शिकवणी नुसार वागतो का, जो धर्माच्या शिकवणी नुसार वागत नसेल तर तो सर्वांना मानसिक शारीरिक त्रास देण्यासाठी त्रासदायक काम करून आपले उपद्रवमूल्य दाखवून सार्वजनिक वातावरण दूषित करीत राहील. त्या एका व्यक्तीमुळे सर्व समाज बदनाम होतो. अशा व्यक्तीपासून सावध राहावे ही काळजी आजच्या काळात सर्व समाजाने घेतली पाहिजे. म्हणूनच सहसंवेदना जागवणारा,सुख-शांती-समाधानाचा संदेश देणारा रमझानचा महिना असतो. रमजानचा महिना संपला की ईद-उल-फित्र चा सण खिरकुर्मा, गोड गोड पदार्थ देऊन साजरा केला जातो. या ईद-उल-फित्र च्या सणानिमीत्त सर्व समाजाला, वाचकांना माझ्या व माझ्या लोकप्रिय दैनिकाकडून हार्दिक शुभेच्छा !!!.

**सागर रामभाऊ तायडे**
भांडुप मुंबई.

(पान क्र. ५ वरून)

and Adivasis don't have enough representation in the country's politics proportionate to their population”

In contrast BJP is trying to dodge the issue. A party which could undertake the massive and painful exercise of NRC in Assam; is rejecting caste census! It told the Supreme Court (2021) that such a census would be "administratively difficult and cumbersome" and that it was a "conscious policy decision" to exclude such information from the census purview.”

The real intent of BJP regarding social justice becomes clear at the times of crucial decisions. Its decision to oppose caste census is one such. During last nine years the, introduction of reservations for ‘Economically Weaker Sections’ of society has already diluted the prevailing provisions and upper caste with income of 8 lakhs will also be eligible for reservations. Economic backwardness has never been in consideration for reservation, as the very concept of reservation was related to caste backwardness, caste as a handicap for one’s place in the society.

Coming back to celebrating Ambedkar Anniversary, it is clear that for parties like BJP Ambedkar’s principles don’t matter. As a matter of fact Hindu nationalist politics came up precisely to oppose the rising assertion of SC/SC/OBC. The foundational ideological pronouncements of this politics glorified the holy tomes and traditions boosting the caste and gender hierarchy. Today what we need is a genuine assessment of the population of different marginalized sections and to modify our policies so that the uneven growth of the society is brought on path of equality. Also the deaths of likes of Rohith Vemula and Darshan Solanki should awaken us to the need to combat the biases constructed against the SC/ST/OBC and strive for a future where ‘annihilation of caste’ is the central credo of our society.

**- Dr. Ram Puniyani**

**REGISTERED**

**SUGAWA MASIK - June 2023**
**Postal Regn.No.PCW/019/2021-2023**
**Registered Newspaper No.31497 / 74**
**Posted at - BPC Vishrambagwada, Pune C.S.O.**
**Pune - 411030**
**Publication & Posting Date - 01/06/2023 (Pages-16)**

(पान क्र. ८ वरून)

त्यामुळे केवळ भारतातच जातिव्यवस्था आहे असे म्हणणे योग्य होणार नाही, तर पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका आणि नेपाळ येथे सुद्धा जातीव्यवस्था वेगवेगळ्या स्वरूपात आहे, हे भारतातील विद्वानांनी लक्षात घेतले पाहिजे, एवढाच येथे मुद्दा आहे.

या सर्वातून जातिव्यवस्था केवळ भारतातच आहे, ते केवळ भारताचेच वैशिष्ट्य आहे, हे जे म्हणणे आहे, ते निखालस खोटे ठरते. जाती व्यवस्था ही कमी अधिक प्रमाणात, विविध स्वरूपात व व्यापक आहे. भारतासह भारतीय उपखंडातील इतर देशांतही ती अस्तित्वात आहे, हेच यातून सिद्ध होते. तेव्हा भारतातील विद्वानांनी जातीव्यवस्था ही केवळ भारतातच आहे, ते केवळ भारताचेच वैशिष्ट्य आहे हे पालुपद लावणे आता येथून पुढे बंद केले पाहिजे.

**कॉम्रेड भीमराव बनसोड**
औरंगाबाद
मोबा - ९४०४९९५५८८

**लेख पाठवावे**

सुगावाचे वैचारिक, परिवर्तनवादी स्वरूप लक्षात घेऊन पुस्तक परीक्षण, स्वतंत्र लिहावा व संग्रहित लेख प्रसिद्धीसाठी जरुर पाठवावेत.

**❊ पत्रव्यवहाराचा पत्ता ❊**
**सुगावा मासिक/ उषा वाघ या नावाने**
**श्रीराम सोसायटी, ६८७, सदाशिव पेठ,**
**कुमठेकर रोड, पुणे – ४११०३०**
**फोन : ०२०–२४४७९२२८**
E-mail : ushawaghpune@gmail.com